विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | : | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| **संस्थापक** | : | **गुंडोपंत, हरिभक्त** |
| **संपादक** | : | **डॉ. विजय वा. बेडेकर** |
| **प्रकाशक** | : | **अनंत विनायक धोरे** |
| **प्रकाशन वर्ष** | : | **२०२०** |
| **वर्ष** | : | **पंचावन्नावे** |
| **अंक** | : | **तिसरा आणि चौथा** |
| **पृष्ठे** | : | **३२ पृष्ठे** |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**
**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०२०**
**गणपत्रिका क्रमांक : २०४**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : पंचावन्नावे अंक : तिसरा अ. आश्विन / नि. आश्विन १९४२ ऑक्टोबर २०२०
अंक : चौथा मार्गशिर्ष / पौष १९४२ जानेवारी २०२१

## *संपादकीय*

### पुन्हा ज्ञानेश्वर

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वरांचा ७२४ वा समाधी सोहळा नुकताच कार्तिक कृष्ण चतुर्दशी अर्थात १३ डिसेंबर २०२० रोजी संपन्न झाला. ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील तत्त्वज्ञ संत म्हणून ओळखले जातात. मराठी भाषेमध्ये भगवद्गीतेवरील प्रासादिक टीका त्यांनी लिहिली वारकरी संप्रदायाला वैचारिक वैचारिक बैठक या ग्रंथामुळे लाभली असे मानले जाते. नाथ संप्रदाय वारकरी संप्रदाय यांच्या अद्वितीय समन्वयात त्यांच्या जीवनदृष्टीचा परिपाक आपल्याला पाहायला मिळतो. बाराव्या शतकात रामदेवराय यादव घराण्याच्या राज्याच्या काळात ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेमध्ये जे अद्वितीय काम साहित्य तत्त्वज्ञान व काव्य या त्रिवेणी संगमाच्या माध्यमातून केले ते अजोड आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी मराठी भाषेमध्ये विवेकवेलीची लावणी केली व ब्रह्मविद्येचा सुकाळ करविला.

ज्ञानेश्वरांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ज्ञानोत्तर भक्तीचा पुरस्कार केला. योगी किंवा साधकाने ज्ञानप्राप्ती मोक्षाचे साधन म्हणून करावी व एकदा ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर मात्र परत समाजामध्ये काम करून भक्तिमार्ग दृढ करावा अशी ज्ञानेश्वरांची धारणा होती. त्यामुळे त्यांनी एका बाजूला अमृतानुभवासारखा अत्यंत तत्त्वज्ञ दृष्टीचा ग्रंथ लिहिला; ज्ञानेश्वरी सारखी गीतेवरील टीका लिहिली आणि दुसऱ्या बाजूला हरिपाठासारखे लोकांना सहज समजतील व रोजच्या पाठात राहतील असे ग्रंथ देखील लिहिले. ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या 'घनु वाजे घुणघुणा वारा वाहे रुणझुणा', 'पैल तो गे काऊ कोकताहे', 'अरे अरे ज्ञाना झालासी पावन', 'विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले' इत्यादी अनेक सुंदर अभंग देखील लिहिले.

(पृष्ठ क्र. २८ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

३) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

४) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्रीमती रेखा प्रकाश दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९९२०७९४७६९/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), काभे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| कालभैरवाष्टकम्। | ५ |
| 'गुढीपाडवा' | ६ |
| निगम-आगम-प्रवाहित-हिंदुधर्म | ९ |
| गायत्री महाविज्ञान | १३ |
| जगद्गुरू श्री आद्य शंकराचार्य आणि पुल | १७ |
| प्रपंच | २३ |


## सद्धर्माची प्रकाशने

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) | श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

**डिसेंबर २०२० पर्यंत**

**दीर्घकालीन सभासद (दी.का.) / ऐच्छिक देणगीदार**

**परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील**

डॉ. अशोक तळवळकर, चेंबुर, मुंबई रु. २५००/-

श्री. सुधाकर श्रीकृष्ण डिडोळकर, कुलाबा, मुंबई रु. १८५०/-

श्री. मुकुंद श्रीधर अळतेकर, फलटण, सातारा रु. ११५०/-

श्री. गणेश गंगाधर कर्वे, पुणे रु. १०००/-

श्री. विनायक वसंत आगटे, डोंबिवली (पू.) रु. १०००/-

सौ. सुनिति अजित नागपूरकर, चेंबुर, मुंबई रु. १०००/-

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ४३ वा

**शुकोऽपि [४]अशनमा[५]प्नोति 'राम राम' इति [६]ब्रुवन्।।** [४४३]

मराठी म्हण : कुत्र सुद्धा पोट भरतं.

सुभाषिताची १ ली ओळ : [१]सद्विद्या यदि का चिन्ता [२]वराको[३]दरपूरणे।

शब्दार्थ : १) ज्ञति विद्या - चांगली विद्या, २) वराक - बिचाऱ्या ३) पोट भरण्याची ४) खाणे ५) मिळवतो ६) म्हणत म्हणत.

सुभाषितार्थ - माणसाजवळ चांगली विद्या असेल तर त्या बिचाऱ्याला पोट भरण्याची चिंता कशाला? पोपटसुद्धा 'राम राम' असे म्हणत आपले पोट भरतो (कुत्र पण पोट भरतं).

**वचने का दरिद्रता?** [४४४]

मराठी म्हण : बोल गं वाचे तुझ काय जातं ?

किंवा : उचलली जीभ लावली टाळूला.

संपूर्ण सुभाषित : प्रियवाक्य प्रदानेन सर्वे- तुष्यन्ति मानवाः तस्मातद्देव वक्तव्यं 'वचने का दरिद्रता?'

सुभाषितार्थ - गोड बोलण्याने सर्व खुष होतात म्हणून तसेच बोलावे. बोलण्यात काटकसर कशाला? उपरोक्तअर्थ संदर्भानुसार बदलतात नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण।।

''देवाचा खेळ असाच चालतो कधी वर कधी खाली''

पहिली ओळ : कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःख- मेकान्ततो वा।-मेघदूत उत्तरमेघ श्लोक ४६.

कालिदास : इंग्रजी म्हण -

**Fortune Flies Like A Wheel**

सरलार्थ : शेवटपर्यंत सुख किंवा शेवटपर्यंत दुःख कोणाला लाभले आहे? कोणतीही दशा चाकाच्या धावेच्या क्रमाप्रमाणे खाली आणि वर जात असते.

**नभोभूषा पूषा।** [४४६]

आकाशाचा अलंकार सूर्य (पूषन्)

**कमलवनभूषा मधुकरः।** [४४७]

कमळांच्या वनांचा अलंकार भुंगा.

**वचोभूषा सत्यम्।** [४४८]

वाणीचा (बोलण्यचा) अलंकार सत्य।

**वरविभवभूषा वितरणम्।** [४४९]

उत्तम वैभवाचा अलंकार दान करणे

**मनोभूषा मैत्री।** [४५०]

मनाचा अलंकार मैत्री

**मधुसमयभूषा मनसिजः।** [४५१]

वसंतऋतुचा (मधुमासाचा) अलंकार मदन.

(पृष्ठ ५ वर)

**कालभैरवाष्टकम्।** **दि. दा. औटी**

**(श्लोक ६ वा)**

**रत्नपादुकाप्रभाभिरामपादयुग्मकं**
**नित्यमद्वितीयमिष्टदैवतं निरंजनम्।**
**मृत्युदर्पनाशनं करालदंष्ट्रमोक्षणम्**
**काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे।।६।।**

पाद १ ला :

रत्नानां पादुके रत्नपादुके ष.तत्पु.।

तयोः प्रभा रत्नपादुकाप्रभा ष.तत्पु.। अभिराम-युक्तं पादयुग्मकम् अभिरामपादयुग्मकम् मध्यमपदलोपी क. धा. समास।

पाद २ रा : न विद्यते द्वितीयम् अद्वितीयम्।

नञ् बहु.। नित्यम् अद्वितीयम् नित्यमद्वितीयम् क.धा.। इष्टम् (इच्छितम्) अद्वितीयं दैवतम् इष्टमद्वितीयदैवतम् क.धा.। निरंजनम् (वि.) साधा, भोळा (भोळा सांब).

पाद ३ रा : मृत्योः (यमस्य) दर्पः ष.तत्पु.

तस्य नाशनं (करोति यः)

दंष्ट्र - (स्त्री.) दात, सुळे, दाढा. करालाः दंष्ट्राः येषां ते करालदंष्ट्राः बहु. (राक्षस) तेभ्यः मोक्षणं करोति सः करालदंष्ट्रमोक्षणः बहु. तम्। करालदंष्ट्रमोक्षणम्।

पाद ४ था : ध्रुवपदच आहे. विवेचन पूर्वीच केले आहे.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाईल : ९६३७२४८१४७/
९४२००५९५७४

•••

(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

**सदोभूषा सूक्तिः।**[४५२]

सभेचा अलंकार उत्तम भाषण.

सकलगुणभूषा च विनयः।४५३

सर्व गुणांचा अलंकार नम्रता.

टीप - सर्व सुभाषितांचे अंग एकापुढे एक ठेवल्यास चार ओळींचा श्लोक तयार होतो. शिखरिणी वृत्तात चांगला गाता येतो.

**दि. दा. औटी**

•••

भारतीय संस्कृतीत जे साडेतीन उत्तम मुहुर्त मानले जातात, त्यापैकी एक वर्षप्रतिपदा अथवा गुढीपाडवा आहे. या दिवसापासून वसंत ऋतू प्रारंभ होतो. सृष्टीला एक नवरूपीय लेणे प्राप्त होते. या शुभ दिवशी कोणत्याही शुभ कार्याचा प्रारंभ करतांना वेगळा मुहूर्त पाहण्याची काहीच आवश्यकता नसते. कोणत्याही खरेदीसाठी उदा. सोने, चांदी, दागिने, कपडे, वास्तू, वाहन इ.इ. साठी हा मुहूर्त उत्तम असतो. सत्संकल्पांनाही हा मुहूर्त अत्त्युत्तम असतो.

इतिहासाचा मागोवा घेतला तर असे समजते की फार प्राचीन काळी ज्योतिषशास्त्रानुसार नवीन वर्षाचा प्रारंभ दिवस ठरत असे. फार प्राचीन काळी मकरसंक्रांत हाच वर्षारंभ दिवस होता कारण त्या दिवशी सूर्य मकर राशीत गेल्यावर म्हणजे सूर्य संक्रमण मकर राशीत झाल्यावर दिवस हळूहळू मोठा होत असतो. कालांतराने ही प्रथा बदलली गेली कारण असे लक्षात आले की त्यावेळी शिशिर ऋतू असतो. वसंत ऋतू सर्व ऋतूत श्रेष्ठ मानला जाते, कारण सृष्टीस प्राप्त होणारे नवरुप वातावरणही चैतन्यमय होते. वृक्षांना नवपालवी फुटते. निसर्गात अनेक आनंददायी आल्हादकारक बदल होतात. त्यामुळे चैत्रमहिना नववर्षप्रारंभासाठी विद्वतजनांना भावला व पटलाही. परिणामी चैत्रमासारंभ हाच दिवस नववर्षारंभ दिवस मानला जाऊ लागला. त्यामागे खगोलशास्त्रीय कारण असे की सूर्य २१ मार्चला 'वसंत संपात' बिंदूवर येतो. त्याआधी 'उत्तरायण' सुरु झालेले असतेच.

पुराणात असे लिहिले आहे की सृष्टीनिर्माण प्रारंभ ब्रह्मदेवाने चैत्र शुद्ध प्रतिपदेसच केला आहे. गुढीपाडव्याला जी गुढी उभारतो तिला 'ब्रह्मध्वज' म्हणतात ते याच कारणास्तव. आणखी एका पौराणिक कथेत असे सांगितले आहे की पूर्वकाली 'वसु' नामक एक सार्वभौम राजा होता. त्याची सत्ता/ राज्य चेदी देशात होते. हा राजा उत्तम प्रशासक, प्रजाहितदक्ष होता. परिणामी त्याच्या देशात प्रजा सुखासमाधानात होती. सर्वत्र सुबत्ता होती, समाधान होते. या आनंदीकालक्रमणेत असतांनाच त्य 'वसू' राजाचे मनात वैराग्यवृत्ती उत्पन्न झाली व तो तपश्चर्येसाठी वनात निघून गेला. त्याने देवराज 'इंद्राची' कठोर तपस्या केली व त्या तपाने कठोर तपाने देवराज इन्द्र प्रसन्न झाला व त्यांनी त्याला वैजयंती माला, वेळूची काठी व विमान दिले व परत राज्यात जाऊन राज्यकारभार करण्याची आज्ञा केली. वसुराजाने देवराज इन्द्रआज्ञा प्रमाण मानून राज्यात परत आल्यावर त्या वेळूची आत्यंतिक भक्तीभावाने पूजा करून तिची स्थापना आपल्या राज्यात आपल्या राजप्रसादाचे प्रवेशदारी केली व या प्रसंगाची आठवण म्हणून

गुढीपाडवा सण साजरा करण्याची प्रथा सुरु झाली, असे त्या कथेत सांगितले आहे.

श्रीप्रभूरामचंद्रांनी चौदा वर्षाचा वनवास संपवून व लंकेश्वर रावणाचा वध करून आनंदाने अयोध्येत समारंभपूर्वक प्रवेश केला तो दिवसही चैत्र शुद्ध प्रतिपदेचाच होता. त्या दिवसाची स्मृती म्हणूनही गुढी चैत्र शुद्ध प्रतिपदेस उभारण्याची प्रथा रूढ झाली.

सुमारे दोन हजार वर्षापूर्वी सातवाहन कुलातील राज्यकर्ता 'शालीवाहन' याने शकांवर पूर्ण निर्णायक विजय मिळवून त्यांचा निप्पात केला व तो दिवसही चैत्र शुद्ध प्रतिपदेचाच होता व या विजयानंतर त्याचा उत्सव सुरु झाला तो गुढी व तोरणे उभारून. याच दिवसापासून त्याचे नावाचा 'शक' प्रारंभ झाला ज्यास 'शालीवाहन शक' असे संबोधले जाते. ही गुढी 'ब्रह्मध्वज' समजून तिची पूजा करतात. तसेच ब्रह्मदेवाची षोडशोपचारे पूजा करण्याची पद्धत याच दिवशी असते. गुढीची म्हणजे ब्रह्मध्वजाची पूजा करून ब्रह्मदेवाची प्रार्थना करतात. 'ब्रह्मध्वजाय नमः' म्हणून पूजा झाल्यावर खालील मंत्र म्हणतात.

''ब्रह्मध्वज नमस्तेऽस्तु सर्वाभीष्टफलप्रदा।
प्राहोऽस्मिन् वत्सरे नित्यं भद्रगृहे मङ्गलं कुरु।।''

या दिवशी बांबूच्या काठीला रेशमी / भरजरी वस्त्र तसेच कडुलिंबाच्या डहाळ्या बांधून त्यावर चांदीचा गडू/तांब्या/पालथा घालतात व ही असते गुढी. त्याआधी सकाळी भल्यापहाटे घर स्वच्छ करून सर्वजण मंगलस्नान करतात. नवीन कपडे अलंकार घालतात. देवपूजा करून तिथी, नक्षत्र, करण, वार, योग ही पाच अंगे असलेल्या नववर्षाचे पंचांगाचे पूजन करून वर्षफल श्रवण करतात. घराचे प्रवेशद्वाराशी सुंदर शुभ रंगावली काढतात. दरवाजे, खिडक्या यांना झेंडू, फुले व आम्रपानांचे सुरेख तोरण बांधतात. मग वरील प्रमाणे वेळूची/बांबूची काठी स्वच्छ धुवून तिच्यावर गंधाने नक्षी काढतात वा सोनेरी कागदाची नक्षी चिकटवतात व या वेळूच्या काठीस एका टोकास भरजरी वस्त्र/ खण, सुवासिक फुलमाळ, कडुनिंबाच्या डहाळ्या, साखरेच्या गाठी बांधून त्यावर चांदीचा गडू पालथा ठेवतात. त्या गडूवरही गंधाने नक्षी काढतात/कुंकुमरेखा काढतात व ती पाटावर प्रवेशद्वाराशी वा खिडकीतून सजवलेले टोक बाहेर काढून व दुसरे टोक खोलीतील खिडकीखाली पाट ठेवून त्यावर टेकवून उभी करतात. तिचे पूजन करून गोड नैवेद्य अर्पण करतात. सारा दिवस सगळे कुटुंब जन आनंदात घालवतात. चैत्र शुद्ध प्रतिपदेस कडुनिंबाची कोवळी पाने वाटून ते चूर्ण चिंचेत कालवून त्यात मिरे, हिंग, ओवा, साखर व मीठ घालून सर्व सदस्य घेतात त्यामुळे सुख, विद्या, आयुष्य व लक्ष्मी यांची वृद्धी होते.

सायंकाळी परत गुढीची पूजा करून 'पुनरागमनायच' म्हणून अक्षता वाहून ती उतरवतात. दिवसभर नव खरेदी, पंचपक्वान्न जेवण, मौज मजा यात काल घालवतात. असा हा गुढीपाडवा. या दिवसापासूनच

श्रीप्रभूरामचंद्रांचे व चैत्रगौरीचे नवरात्र सुरु होते.

आपणा सर्वांना हे नवसंवत्सर सुख, समृद्धी, आयुरारोग्य, ऐश्वर्य, शांती समाधानाचे जावो ही श्रीचरणी प्रार्थना.

आज जर आपण विचार केला तर असे वाटते आपणास कोणत्या प्रकारचे जीवनमान या राज्यकर्त्यांनी दिले आहे. कोठेही प्रजा सुखासमाधानात नाही. 'सज्जनांना ठोका अन दुर्जनांना ठेका' असेच हे विपरीत चित्र आहे. राम राज्य नसून 'हराम राज्य' आहे. सज्जनांना 'हे राम' म्हणण्यास लावणारे हे राज्य आहे. त्याग, समर्पण, नीती या गोष्टी बासनात गुंडाळून स्वार्थापोटी सर्वत्र भ्रष्टाचार, अन्याय, अनीति, चारित्र्यहीनता, स्त्रीयांवर बलात्कार, आर्थिक शोषण, सर्वत्र माफीयांचा धुमाकूळ, खून, मारामाऱ्या, लूट, समाजकंटकांना मोकळे रान, पोलीस व न्यायखात्यातील भ्रष्टाचार, भोंगळा बेशिस्त कारभार, शेत खाणारी कुंपणे, 'बळी तो कान पिळी' या न्यायाने समाजजीवनाचे शोषण व परवड, देशात परकीय हस्तकांच्या दहशतवादी कारवाया, संरक्षण दलातील भ्रष्टाचार, प्रचंड काळा पैसा, देवस्थानातही भाविकांचे शोषण–विश्वस्तांचे पोषण, गैरकारभार, धर्माचे व ज्योतिषाचे नावावर भाविकांची फसवणूक, वैद्यकीय भ्रष्टाचार, शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार भ्रष्टाचारी वाममार्गी नेते, प्रचंड लाचलुचपत, आर्थिक महाघोटाळे, लाचखाऊ अधिकारी इ.इ. अनेकविध तऱ्हेने समाजजीवनाची सर्वच राजकीयपक्षांनी वाट लावली आहे व लावत आहेत. परिणाम महागाई, भेसळ, टंचाई इ.इ. संकटातून जनता जगते का मरते याचे त्यांना सोयरसुतकही नाही. सत्तेच्या खुर्चीसाठी सर्व संस्कार, नीतिमूल्ये, धर्म व न्यायतत्त्वे, चारित्र्य यांना गुंडाळून ठेवून समाजजीवनाची प्रचंड हानी ते करत आहेत. महात्मा गांधीचा चरखा यांना समजतो तो चर, खा अशाच अर्थाने.

असले हे शककर्ते? आज उदयास आले आहेत. हे शक कर्ते म्हणजे त्यांच्या कृत्यांवर शक (संशय) येईल असे वागणारे राज्यकर्ते आहेत. काय यांची कर्तबगारी! काय चारित्र्य! काय त्याग! अशा या शककर्त्यांच्या राज्यात महागाईच्या काठीवर, भ्रष्टाचाराचा सोन्याचा गडू व गरीब जनतेचे वस्त्रहरण केलेल्या वस्त्राचा खण, विषवल्लीचा पाला डहाळ्या, अनैतिकतेच्या लाचांब्याच्या पानांची माळ व खाबुगिरीची बहुरंगी गाठी यांनी केलेली गुढी उभारुन तिला चारित्र्यहीनतेच्या पाटावर उभी करून नैवेद्य दाखवायचा त्रिरंगी खादाडीचा म्हणजे बळीराजांच्या आत्महत्या, लाचार समाजजीवन व हतवीर्य (षंढत्व) यांचा.

तरीही जनता हा सण साजरा करतेच आहे. एका नव्या शककर्त्याचे प्रतिक्षेत याच आशेने की ''रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उषःकाल'' व याच भावनेने अपेक्षेने, कदाचित ती भगवान श्रीकृष्णांचे भगवद्गीतेतील ''यदा यदाही .... संभवामि युगे युगे'' या वचनावर श्रद्धा ठेवूनच जगत आहे एवढेच म्हणावे लागेल आत्मसुखासाठी.

(पृष्ठ १२ वर)

हिंदुधर्माबद्दल आजपर्यंत अनेक थोर अभ्यासकांनी लिखाण केले आहे. परंतु आजकाल अनेक प्रौढ पालक मुलीच्या किंवा सुनेच्या बाळंतपणाच्या निमित्ताने ५/६ महिने व्हिसा मिळवून मुलामुलींकडे जाऊन राहतात. त्यावेळी हिंदुधर्माबद्दल थोडक्यात माहिती सांगा अशी तिथल्या अमेरिकन स्त्री पुरुषांनी मागणी केली तर त्यांना ती पुरी करणे बऱ्याचदा जड जाते. म्हणून या लेखातून एक प्रकारे ज्येष्ठ हिंदु नागरिकांसाठी एक पाथेय म्हणजे शिदोरी पुरवण्याचा विचार आहे.

वेदाबद्दल विचारले तर ते अनादि आहेत अपौरुषेय आहेत इतपत आपल्याला ठाऊक असते म्हणजे नेमके काय? तर त्याचे उत्तर आहे : भारतात आपल्या पूर्वजांनी यज्ञसंस्कृतीचा प्रामुख्याने अवलंब केला. सिंधु खोऱ्यातल्या उत्खननात देखील प्राचीन यज्ञकुंडांचे अवशेष सापडले. तर त्यांचे सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवन यज्ञसंस्थेभोवती विकसित झाले. एक दिवसाच्या यज्ञापासून ते १/१ महिना चालणाऱ्या यज्ञसत्रापर्यंत राजे लोक व धनिक लोक यज्ञ चालवीत. त्यातून त्यांना पुण्य प्राप्ती होई. यज्ञासाठी दूरदूरहून लोक येत राहात. त्यातून सामाजिक जीवन विकसित झाले. आपल्याला उपलब्ध साहित्यिक पुराव्यात रघुराजाने विश्वजित यज्ञ केला आणि त्यात विश्व जिंकले आणि स्वतः जवळचे सर्व धन दान केले. त्यावेळी वरतन्तूचा शिष्य कौत्स १४ कोटि गुरुदक्षिणेसाठी धनयाचना करायला आला. पृथ्वीवरचे सर्व राजे जिंकल्यामुळे तो कोणावर स्वारी करुन धन मिळवू शकत नव्हता. म्हणून त्यांने पृथ्वी पलीकडे कुबेरावर स्वारी करायचे ठरवले. तेव्हा कुबेराने रातोरात त्याच्या खजिन्यावर सुवर्णमुद्रांचा पाऊस पाडला. त्यानंतर तत्कालीन संस्कृतीचे दर्शन घडवणारा कौत्स-रघुसंवाद आहे. रघुराजा कौस्ताला म्हणाला, ''तुझ्यासाठी मी हे धन मिळवले आहे ते सगळे तू घेऊन जा.'' कौत्स म्हणाला, ''मी यातल्या फक्त चौदा कोटि सुवर्ण मुद्रा गुरुदक्षिणेसाठी नेणार.''

तर हा काळ प्राचीन श्रीरामाच्या पणजोबांचा. तर यज्ञ संस्कृतीच्या भोवती विकसित झालेल्या प्राचीन हिंदु संस्कृतीची त्यातून मिळते एक झलक. त्यानंतर श्रीरामांनी अश्वमेध यज्ञ केला आणि अश्व मोकळा सोडला. तो जो अडवेल त्याच्याशी युद्ध करुन त्याला जिंकायचे हा तत्कालीन राजांचा प्रघात. तो अश्व नेमका वाल्मिकी आश्रमातून जाताना लवकुशानी अडवला. आणि त्यांच्यासमोर भरत, शत्रुघ्न आणि लक्ष्मणदेखील पराभूत झाले इ. कथा रामायणात येते. हे झाले त्रेतायुगांत. त्यानंतर द्वापरयुगात धर्म राजांनी केलेल्या राजसूय यज्ञाचे वर्णन येते. पांडवांचा नातू जनमेजय याने सर्पसत्र केल्याचे वर्णन कलियुगाच्या प्रारंभी येते. त्यानंतर कालिदासाच्या काळापर्यंत यज्ञसंस्कृती चालत आल्याचे

इंदुमती स्वयंवरातील एका राजाच्या वर्णनावरुन दिसते. कालिदासाने आपल्या शैलीत अतिशयोक्ती अलंकार वापरला आहे. यज्ञातली पहिली आहुती इंद्रायस्वाहा अशी असते. तर त्या राजाने इतके यज्ञ केले की एका यज्ञातली आहुती घेऊन इंद्र परत आपल्या घरी जाई आणि त्याच्या स्वागतासाठी शची मंदार म्हणजे पारिजाताची फुले केसात माळून स्वागताला दाराशी उभी राही. तर दाराशी पोचताच इंद्राय स्वाहा अशी दुसरी हाक त्या राजाच्या दुसऱ्या यज्ञाची येई. त्यामुळे चिरकाल पर्यंत शचीचे केस पारिजातपुष्पविरहितच राहिले हा त्या राजाचा विक्रम. 'शच्याः चिरं पांडुकपोल–लंबान् मन्दारशून्यान् अलकान् चकार ।।' इसवी सनाच्या पहिल्या सहस्रकात शिलालेखामध्ये यज्ञांचे उल्लेख येतात. तर यज्ञ संस्थेला केंद्रीभूत करुन विकसित झालेला हा सांस्कृतिक हिंदुधर्म त्रेतायुग आणि कलियुगाची निदान तीन हजारवर्षे समाजाची जडणघडण करीत राहिला आहे. तर यांना पूर्वजांनी ते थेट लो. टिळकांपर्यंत निगमधर्म असे नांव दिले आहे. पुरातत्त्व उत्खननात कच्च्या मातीच्या विटातील यज्ञकुंडे सापडली. तो यज्ञयाग संपून लोक निघून गेले की त्या विटा भाजून निघत आणि पुरातत्त्व परिभाषेत त्याला टेराकोटा असे म्हणतात. टेराकोटाचे भग्नाकशेष हे पुरातत्त्व पुराव्याचे महत्वाचे साक्षीदार आहेत.

आगमधर्म – आगम धर्माची नेमकी थोडक्यात ओळख म्हणजे मंदिरांतर्गत मूर्तिपूजेभोवती विकसित झालेला धर्म. निगम–धर्म अति प्राचीन असल्याने त्याच्या वर्णनाला अनादी अपौरुषेय, अनंत अशी विशेषणे लावावी लागतात. पण आगमधर्माचे स्वरुप नेमके त्याच्या उलट आहे. इ. सनाच्या ६/७ व्या शतकापर्यंतच्या ईश्वर, परमेश्वर या पांचरात्रसंहितेत याचा उगम स्पष्ट शब्दात दिला आहे. ''द्वापरस्य युगस्य अन्ते आदौ कलियुगस्यच।'' म्हणजे द्वापर कलियुगांच्या संधिकाळात म्हणजे महाभारत युद्धोत्तर काळात. श्रीकृष्ण निजधामाला गेल्यानंतर कलियुगाचा प्रारंभ झाला असे व्यासांनी म्हटले आहे. तर पांचरात्रसंहितानीं तो नेमका काळ नोंदवला आहे. म्हणजे अनादिकाळ नाही. आता निगमधर्म अपौरुषेय वेदावर आधारित; पण आगमधर्माचा प्रवर्तक त्याच संहितातः ''वक्ता नारायण स्वयम्।'' असा आहे.

ऐतिहासिक दृष्ट्या या धर्माचा उगम काश्मीरमध्ये झाला असे आढळते. रामानुजाचार्य हजार वर्षापूर्वी होऊन गेले. त्यांनी देवालय यांच्या निर्मितीला फार मोठा हातभर लावला. त्यांचे गुरु यामुनाचार्य यांच्याकाळात हा मंदिरान्तर्गत मूर्तिपूजेचा धर्म काश्मीरकडून दक्षित भारतात पोचला असावा. उत्तरभारतात इ. सनाच्या पहिल्या सहस्त्रक्रांत गुप्तकाळांत खूप मंदिरे निर्माण झाली. मात्र दक्षिण भारतात निगमधर्माचा फार मोठा प्रभाव असावा. त्यामुळे आगमधर्माला खूप संघर्ष करावा लागला असावा. मात्र गेली काही शतके दक्षिण भारताचे वर्णन देऊळा राऊळांचा प्रदेश असे यथार्थ आहे. तर यामुनाचार्यांना आगमप्रामाण्य हा ग्रंथ ९ व्या शतकात लिहावा

लागला. त्या ग्रंथात त्यांनी मंदिरान्तर्गत मूर्तिपूजेच्या या धर्माला काश्मीरागम हे नाव स्वतःच दिले आहे Van Buitenen या डच विद्वानानें आगमप्रामाण्य ग्रंथाचे संपादन केले आणि प्रस्तावनेत यामुनाचार्यांना पांचरात्रिक नैय्यायिक हे बिरुद लावले आहे. तर यामुनाचार्यांनी निगमधर्माशी तडजोडीचे धोरण स्वीकारले व आगमाला वेदतुल्य प्रामाण्य बहाल केले. एकंदरीत असे दिसते की 'यस्य निःश्वसितं वेदाः' या वचनातून वेद हे परमेश्वराचे श्वास ठरतात. आणि 'वक्त्र नारायणः स्वयम्' या वचनातून आगम हे परमेश्वराच्या मुखातले उद्‌गार ठरतात. तर नाकातून प्रकटणारे श्वासोच्छवास आणि मुखावाटे प्रगटणारे उद्‌गार याच्यामागे प्राणशक्ती एकच म्हणून वेदतुल्य प्रामाण्य ठरते. यामुनाचार्यांच्या नंतर वेदान्तदेशिकांना आगमाच्या समर्थनार्थ पांचरात्ररक्षा हा ग्रंथ लिहावा लागला.

तर द्वापरयुगाच्या शेवटी आणि कलियुगारंभी हा जो मंदिरांतर्गत मूर्तिपूजेचा धर्म सुरु झाला तो आजतागायत फोफावत राहिला आहे. नव्या नगररचनेच्या परिभाषेत उपनगरात जेवढ्या सहकारी गृहरचना संस्था निर्माण होतात. त्यांना महानगरपालिकेच्या नियमानुसार एक मोकळा भूखंड ठेवावा लागतो. त्याठिकाणी रहिवाशांच्या मागणीनुसार एकारे छोटे मंदिर उभे राहाते. त्याशिवाय शहरातील पदपथावर उभ्या राहिलेल्या छोट्या देवळांची संख्या अगणित आहे. असे म्हणतात की ज्यावेळी कॉंग्रेसचा पराभव करुन द्रविड मुन्नेत्र कळहम हा पक्ष निवडून आला त्याचा आद्य संस्थापक आहे पं. रामस्वामी नायकर त्यांचा पुतळा कांचीमध्ये शंकराचार्यांच्या मठासमोर रस्त्यावर आहे. त्याच्या खाली ओळी आहेत 'There is no god. Who ever preaches god is a scoundre; who ever believes in god is a fool.' पण विरोधाभास पहा. त्या पुतळ्याला भक्तगण रोज सकाळ संध्याकाळ हार घालून उदबत्ती लावतात. DMK चे मंत्रिमंडळ आल्यावर त्यांच्या ११७ आमदारांनी फूटपाथवरील ११७ मारुती समोर नारळ फोडले. मद्रासच्या फूटपाथवरील मंदिरासमोर एक दानपेटी असते. त्याचा प्रमुख त्या पेट्यांची रात्री कुलुपे उघडून पैसे गोळा करत मोटर सायकलवरुन जातो. त्याचा गल्ला कित्येक हजारांचा असतो. !!

आता मी हा लेख गेले तासभर लिहित आहे. तेवढ्या वेळात भारतातल्या नव्हे महाराष्ट्रातल्या कुठल्या न कुठल्या उपनगरामध्ये एखाद्या जागेवर नवीन मंदिराची पायाभरणी, पादेष्टका, एखाद्या मंदिराची कळसपूजा मूर्धेष्टका, एकाद्या मंदिरातला उत्सव, जीर्णोद्धार असे कार्यक्रम कुठेना कुठे चालू असतात. रामानुजाचार्यांनी हा आगमधर्म तळागाळापर्यंत पोचवला याचे प्रत्यंतर आज ही येते. एकदा ज्ञानेश्वर समाधि सप्तशतकोत्तर सोहळा MIT च्या विश्वशांति सभागृहासमोर चालू होता. त्यासाठी युनेस्कोचे एक अधिकारी श्रीवैष्णव पाश्वसारथी व्यासपीठावर होते. मेलकोटे यदुगिरी यतिराज मठाधिपतींच्याबरोबर मी मैदानातून चाललो होतो तर पार्थसारथी व्यासपीठावरुन उतरुन चालत आले आणि

त्यांना त्यांनी साष्टांग दंडवत प्रणाम केला. त्याआधी मी मुंबईच्या V.T. म्हणजे छत्रपती शिवाजी टर्मिनस स्टेशनवर कपाळावर ऊर्ध्वपुण्ड लावलेला एक हमाल पाहिला. युनेस्को अधिकारी पार्थसारथी ते थेट स्टेशनवरील हमाल इथपर्यंत रामानुजाचार्यांनी मंदिरांतर्गत मूर्तिपेजूचा धर्म पोचवला हे सत्य आहे.

तर त्या रामानुचार्यांचा एक किस्सा. अंदाजे हजार वर्षांपूर्वी तिरुपती बालाजी हा विष्णु की वेंकटेश्वर म्हणून शिव असा वाद झाला. त्यावेळी भद्राचलम्च्या राजाकडे हा वाद गेला. त्यावेळी त्यांनी लवाद नेमला. त्याप्रमाणे शंखचक्र आणि त्रिशूल डमरु ही आयुधे देवासमोर गाभाऱ्यात रात्री ठेवायची आणि पुजाऱ्यांनी गर्भगृह बंद करायचे. तर असे म्हणतात की तिरुपतीच्या बालाजीच्या हातात आज जे शंखचक्र आहेत ते त्यांनी हजार वर्षापूर्वी धारण केले. तर त्यावेळच्या शैव भक्तांनी असे तर्कट लढवले की रामानुजाचार्यांना अणिमा शक्तिअवगत होती. त्या आधारे त्यांनी मूषकरुप धारण केले आणि मूर्तिच्या स्नानानंतर अभिषेकाचे पाणी ज्या छोट्या पन्हाळीतून गाभाऱ्याबाहेर पडते त्यातून आत प्रवेश केला. आत जाऊन मानुषरुप घेतले आणि शंखचक्र देवाच्या हातात ठेवले आणि पुन्हा उंदाराचे रुप घेऊन ते बाहेर आले. आता हे सगळे तर्कट मान्य केले तरी रामानुजचार्यांनी अणिमा शक्ति त्यांना मान्य होती हे एक आणि रामानुजाचार्यांची तथा कथित लबाडी बालाजींने सहस्रवर्षे खपवून घेतली आणि शंखचक्रधारण करुन तो भक्तांना दर्शन देतो आहे हे दुसरे; आणि केवळ काही सेकंदाचा दर्शनासाठी भक्त देशविदेशातून मोठ्या संख्यने येतात. म्हणजे रामानुजाचार्यांची गुश्ताखी माफ !

तात्पर्य आगमधर्मिनें कलियुगातील तीन सहस्रके निगमधर्माच्या हातात हात घालून प्रवास केला व गेली दोन सहस्रके हळूहळू निगमधर्म मागच्या बाकावर गेला आणि आगमधर्म पुरःसर झाला.

**डॉ. प्रभाकर आपटे**
सी–५–४०१, बुद्धदेवविहार, हिल गार्डन,
ठाणे (पश्चिम) – ४०० ६०१.
मो. ७०२१७७६५१५

•••

(पृष्ठ क्र.८ वरून...'**गुढीपाडवा**')

लेखांती चार ओळीची कविता लिहून लेखसमाप्ती.

''नाही दिसत दीव्यत्व, जोडण्यास दोन्ही कर।
ना मांगल्य पावित्र्य, ना नीति सदाचार ।।
भ्रष्टाचारी दुनियेत या, पाहून सज्जन निराधार।
तुम्हीच विचार करा, गुढी कश्याची उभारणार।।''

इत्यलम्

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे – ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३
Email : vasantgod@gmail.com

•••

**गायत्रीवर अतिसंक्षिप्त टिपण**

**गायत्रीची निर्मिती :**

आपली पृथ्वी आणि इतर ग्रह हे सर्व सूर्याभावती फिरत असतात. त्यामुळे आपले 'सौर-मंडल' (सूर्यमालिका) झाले आहे. अशा अनेक किंवा असंख्य सूर्यमालिका आकाशगंगेत (गॅलॅक्सीमध्ये) असतात. अशा असंख्य आकाशगंगा कोणत्या तरी अतिशक्तिमान केंद्राभावती गुरुत्वाकर्षणाने फिरत असतात. असे हे सर्व शक्तिमान केंद्र म्हणजे, 'ब्रह्म' जे कधी दिसत नाही, भासत नाही, आणि अतिशय अथांग, अफाट, आणि निर्विकार असते. अशा या ब्रह्माने 'एकोऽहम्, बहुस्याम्' (वेदांतील एक वचन) म्हणजे मी एक जरी असलो तरी मला अनेक रुपे घ्यायची आहेत. आणि त्यामुळे आपल्या सामर्थ्यामुळे ब्रह्माने एक शक्ती निर्माण केली. त्या शक्तीचे नाव म्हणजे 'गायत्री'. याच शक्तीने ब्रह्मदेव, विष्णू व महेश या प्रमुख त्रिदेवांची निर्मिती केली आणि त्यांना विशिष्ठ कामे करण्यासाठी लागणाऱ्या शक्ती प्रदान केल्या. ब्रह्मदेवाला दिलेल्या शक्तीचे नाव सरस्वती की जी ज्ञानाचे असंख्य भांडार आहे. विष्णूला दिलेल्या शक्तीचे नाव 'लक्ष्मी' की जी सर्व जगावर सुख-समृद्धीचा सतत वर्षात करीत असते. आणि महेशाला दिलेल्या शक्तीचे नाव 'काली किंवा चंडिका', ही पार्वतीचीच रुपे आहेत आणि ती या जगातील दुष्ट प्रवृत्तींचा नाश करते. महापूर, भूकंप, युद्धे, रोगराईने होणारे असंख्य मृत्यू याचे कारण तीच आहे. या त्रिदेवांना मिळालेल्या शक्तीमुळे स्वनियंत्रित आणि स्वसंचालित विश्व निर्माण झाले. याच्या मुळाशी जी आहे ती शक्ती म्हणजे गायत्री.

**गायत्री आणि ब्रह्माचे ऐक्य –**

गायत्री म्हणजे कोणी स्वतंत्र देवी-देवता नव्हे. ती तर ब्रह्माची क्रियाशक्ती आहे. ब्रह्म हे निर्विकार, आणि अचिंत्य आहे आणि बुद्धीच्या पलीकडील आहे. त्यामुळे या ब्रह्माच्या शक्तीमुळे ते गायत्रीच्या रुपाने उपास्य बनते. गायत्रीची उपासना म्हणजेच त्या ब्रह्माची-सर्वश्रेष्ठ उपासना आहे. बृहत्योगी याज्ञवल्क्य स्मृतीमध्ये भुर्भूस्वः या तीन महाव्याहृती, २४ अक्षरांची गायत्री आणि चारही वेद निःसन्देह ओंकार स्वरुप ब्रह्म होय असे म्हटले आहे.

शतपथ ब्राह्मणामध्ये (ब्राह्मण नावाचा ग्रंथ) ब्रह्म हेच गायत्री आहे आणि गायत्री हेच ब्रह्म आहे असे म्हटले आहे. १८ पुराणे, आणि वेदमंत्रांची ४ वेदांमध्ये गुणकर्मानुसार विभागणी करणारे श्री भगवान व्यास मुनी यांनी असे म्हटले आहे की गायत्री आणि ब्रह्म यांच्यात मुळीच भिन्नता नाही. म्हणून कोणत्याही प्रकाराने का होईना, ब्रह्मस्वरुपी गायत्रीची आत्मभावाने उपासना करावी.

**गायत्री मंत्रातील २४ अक्षरे व त्याचा परिणाम :**

गायत्री मंत्रात एकूण २४ अक्षरे आहेत. (ॐ आणि ३ महाव्याहृती सोडून). गायत्रीचा जप सुरु केल्यावर मंत्रातील प्रत्येक अक्षराचा आप्ल्या शरीरातील यौगिक ग्रंथींवर (ग्लँडस्) काय परिणाम होतो याचे विवरण असे आहे.

| क्र. | अक्षर | देवता | यौगिक ग्रंथींचे नाव | त्यातील समाविष्ट शक्ती |
|---|---|---|---|---|
| १ | तत् | गणेश | तापिनी | यशःशक्ती, विघ्न, निरसन |
| २ | स | नृसिंह | सफला | पराक्रमशक्ती, शौर्य, शत्रुनाश |
| ३ | वि | विष्णू | विश्वा | पालनशक्ती, रक्षण |
| ४ | तुर् | शिव | तुष्टी | कल्याणशक्ती, अनिष्ट विनाश |
| ५ | व | कृष्ण | वरदा | योगशक्ती, गतिमानता, क्रियाशीलता, कर्मयोग |
| ६ | रे | राधा | रेवती | प्रेमशक्ती, द्वेषभावनेचा त्याग |
| ७ | णि | लक्ष्मी | सूक्ष्मा | धनशक्ती, धन, पद, यश आणि भोग्य पदार्थांची प्राप्ती |
| ८ | यं | अग्नी | ज्ञाना | तेजशक्ती, सामर्थ्य, प्रभावशाली, प्रतिभासंपन्न |
| ९ | भर् | इन्द्र | भर्गा | रक्षणशक्ती, रोग, हिंसक, चोर, शत्रू, भूतप्रेत, अनिष्ट शक्तीपासून रक्षण |
| १० | गो | सरस्वती | गोमती | बुद्धिशक्ती, मेधावृद्धी, चतुरता, दूरदर्शिता, विवेकशीलता |
| ११ | दे | दुर्गा | देविका | दमनशक्ती, विघ्नांवर मात, दुष्टांचे पारिपत्य, शत्रूंचा संहार |
| १२ | व | हनुमान | वराही | निष्ठाशक्ती, विश्वास, निर्भय |
| १३ | स्य | पृथ्वी | सिंहिणी | धारणाशक्ती, क्षमाशीलता, सहिष्णुता, धैर्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | धी | सूर्य | ध्याना | प्राणशक्ती, आरोग्य संपन्नता, दीर्घायुष्य, विकास |
| १५ | म | राम | मर्यादा | सौम्यता, संयम, मैत्री |
| १६ | हि | सीता | स्फुटा | तपशक्ती, पवित्रता, मधुरता, सात्विकता, शील, नम्रता |
| १७ | धि | चंद्र | मेधा | शांतिशक्ती, षड्रिपूंचे शमन |
| १८ | यो | यम | योगमाया | कालशक्ती, मृत्यूपासून निर्भयता, स्फूर्ती, जागरुकता |
| १९ | यो | ब्रह्मदेव | योगिनी | उत्पादकशक्ती, वस्तू, संतती, पशू, कृषी, वृक्ष यात वाढ |
| २० | नः | वरुण | धारिणी | रसशक्ती, भावनाशीलता, सरलता, कलाप्रियता, कवित्व, दया, कोमलता, प्रसन्नता, माधुर्य, सौंदर्य |
| २१ | प्र | नारायण | प्रभवा | आदर्शशक्ती, उच्च आकांक्षा, श्रेष्ठता, दिव्य गुण, दिव्य स्वभाव, उज्ज्वल चरित्र. |
| २२ | चो | हयग्रीव | उष्मा | साहसशक्ती, उत्साह, वीरता, शूरता, निर्भयता, पुरुषार्थ |
| २३ | द | हंस | दृश्या | विवेकशक्ती, उज्ज्वल कीर्ती आत्मसंतोष, दूरदर्शिता, सत्संगती, उत्तम आहार विहार |
| २४ | यात् | तुलसी | निरंजना | सेवाशक्ती, लोकसेवा, सत्यता, पतिव्रता, पत्नीव्रत, परदुःख निवारण. |

गायत्री उपासनेमुळे उपयुक्त २४ ग्रंथी (ग्लँडस्) आणि त्यांच्या शक्तींमध्ये त्या त्या देवतेमार्फत जागृती निर्माण होते. ही शक्ती देण्याची प्रक्रिया अतिशय सूक्ष्म असते. जप करणाऱ्या व्यक्तीला ते कळतही नाही. हे गुण इतके महत्त्वाचे आहेत की त्यांच्या जागृतीने व विकासाने विविध प्रकारच्या सिद्धी, यश व समृद्धीचा, जप करणाऱ्या व्यक्तीस लाभ घडत असतो. सूक्षातिसूक्ष्म परिवर्तन ज्याला कळेल त्याला गायत्री-उपासना साधना

म्हणजे एखादा अंधविश्वास नव्हे, तर ते ठोस वैज्ञानिक कार्य असून त्याचे लाभ निश्चित नियमानुसार होतात. Astrological co-relations with the ductless glands यावर पाश्चात्य अभ्यासक आणि संशोधक यांच्या conference मध्ये जी चर्चा झाली त्यात अन्तःस्रावी ग्रंथींची चर्चा ग्रहांच्या रुपात केली गेली. ज्याप्रमाणे सौर मंडलात (सूर्यमालिकेत) विविध ग्रहांचे परस्पर संतुलन गुरुत्वाकर्षणामुळे साधलं गेलं आहे, त्याचप्रमाणे शारीरिक व मानसिक संतुलन मानवी शरीरात साधलं गेलं आहे. सूर्याचा संबंध पीनीयल ग्लँडस्शी चंद्राचा संबंध पिट्ट्यूटरी ग्लँडशी, मंगळाचा संबंध पॅराथाईड ग्लँडशी, बुधाचा संबंध थॉयराईड ग्लँडशी, बृहस्पतीचा संबंध अँड्रीनल ग्लँडस्शी, शुक्राचा संबंध थायमसशी आहे. ''ऑकल्ट ॲनाटॉमी'' या पुस्तकाच्या लेखकाने या ग्रंथींचा उल्लेख ''ईथर सेंटर्स'' असा केला आहे. असे लक्षात आले आहे की, अविज्ञात चेतना केंद्रामुळे या ग्रंथीच्या माध्यमातून मानवाला काही असाधारण लाभ मिळत आले आहेत. ही अविज्ञात चेतना-केंद्रे म्हणजचे गायत्रीची शारीरिक रुपे, म्हणजेच २४ ग्रंथी आहेत. आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी अत्यंत सूत्ररुपात गायत्रीच्या २४ अक्षरांत ह्या ग्रंथी व त्यांच्या शक्ती समाविष्ट केल्या आहेत.

**गायत्रीचे कार्य कसे चालते?**

शास्त्रशुद्र पद्धतीने गायत्री मंत्राचा उच्चार केल्यास, गायत्रीच्या शक्तीचा किरण तात्काळ जप करणाऱ्याच्या शरीरात प्रवेश करतो व माणसाच्या शरीरातील ग्रंथींना उत्तेजना देतो. एक वार जप केल्याने देखील ही उत्तेजना प्राप्त होते आणि ही उत्तेजना जास्त काळ, दीर्घ काळापर्यंत जर शरीरात टिकविता आली तर गायत्री जप १० वेळा, १०८ वेळा, १००० वेळा केला गेला तर लाभ किती व काय काय होईल याचा आपण विचार केला पाहिजे.

फिलॉसॉफिकल सोसायटीच्या एका पुस्तकात हिंदु सामाजिक प्रार्थना व त्याचे विवरण इंग्लीश भाषेत केले आहे. त्या पुस्तकाला चार्लस वेब्स्टर लेडबीटर यांची दीर्घ प्रस्तावना आहे. त्यांनी गायत्रीचा खूप अभ्यास केला होता. त्यांना हा अभ्यास दिव्यदृष्टीने (Clairvoyance) करता आला. एका व्यक्तिने एक मंत्र जपला तरी गायत्रीच्या तेजाचा आणि शक्तिचा एक किरण जप करणाऱ्याच्या शरीरात जातो.

(लेखाचा उर्वरित भाग पुढील अंकी...)

**– ॲड. रा. ना. कलभंडे**
गायत्री उपासक आणि अभ्यासक
११/अे-१, गजलक्ष्मी सोसायटी,
सहकार नगर नं. १, अरण्येश्वर रस्ता,
पुणे - ४११००९
फोन नं. : ०२०-२४२२४९३४
भ्रमणध्वनी : ९८५०९५८०९४

•••

## जगद्गुरू श्री आद्य शंकराचार्य आणि पुल

सुहास हरी जोशी

माझे हे शीर्षक वाचून अनेकांना प्रचंड आश्चर्य वाटेल. पुल तसे नास्तिक, बुद्धिवादी, नव्हे तर्कक्र्कश कठोर बुद्धिवादी, सुधारक, पूर्वाश्रमीचे समाजवादी आणि त्यांच्या जीवनात, साहित्यात शंकराचार्य विषय कुठून आला? मलाही आश्चर्य वाटतंय, पण वस्तुस्थितीच आहे. मला वाटतं की श्रीसमर्थ रामदास स्वामींचा, पी. जी. वुडहाऊसचा चार्ली चॅपलिनचा, काही इंग्रजी लेखकांचा जसा प्रभाव पुलंवर आहे तसाच आद्य श्री शंकराचार्यांचाही प्रभाव पुलंवर आहे.

आपण ह्या बाबतीत शोध घेण्याचा प्रयत्न करू या.

१९८३ सालची गोष्ट. आदि शंकराचार्य हा पहिला संस्कृत चित्रपट श्री. जी. व्ही. अय्यर ह्यांनी प्रदर्शित केला. नॅशनल फिल्म ॲवॉर्ड हा पुरस्कार अधिक आणखी चार पुरस्कार ह्या चित्रपटाला प्राप्त झाले.

प्रख्यात थोर कार्यकर्ते, महान संस्कृत पंडित, अनेकानेक विक्रम करणारे पं. वसंत अ. गाडगीळ ह्यांच्या प्रयत्नातून हा चित्रपट एका रविवारच्या सकाळी प्रभात चित्रपटगृहात दाखविला गेला त्यांना धन्यवाद.

भारतीय इतिहास संकलन समितीचे डॉ. चिं. ना. तथा बंडोपंत परचुरे ह्यांचाही सहभाग असावा. आता ह्या गोष्टीला ३७ वर्षे झाली. त्यामुळे नीट आठवत नाही, पण बहुधा बंडोपंतांनी मला दोन प्रवेशिका पुल-सुनीताताईंसाठी मजजवळ दिल्या किंवा पुलंनी हा चित्रपट पाहण्याची इच्छा आहे असे कळल्यावरून डॉ. बंडोपंतांनी त्यांना ह्या प्रवेशिका देण्यास मला सांगितले. असो. किंवा ''वसंतरावांनीच पुलंना दिल्या असाव्यात'' नेमके आठवत नाही.

रविवारी सकाळी प्रभातमध्ये उपस्थित झालो. पुलं आणि सुनीताताई आलेलेच होते. चित्रपट फारच छान आहे. चित्रपट संपला, प्रेक्षक बाहेर पडले. मी धावत जाऊन पुलंना प्रभात ते श्री दक्षिणमुखी मारुती रस्त्यावर गाठले नि विचारले, ''कसा काय वाटला आपल्याला चित्रपट?'' पुल काय बोलणार, म्हणून मला धाकधूक होती; पण पुल व्यवस्थित बोलले. मला म्हणाले चित्रपट चांगला आहे- पण मला पाहिजे तसा नाही. शंकराचार्य कसे आक्रमक आहेत, शांकर भाष्यात आपल्याला ते जसे दिसतात, तो भाव ह्या चित्रपटात नाही. अहो, 'शंकराचार्य हा माझा अत्यंत आवडता लेखक आहे!' हे ऐकून मी थक्कच झालो.

पुन्हा मला श्री शंकराचार्य भेटले ते त्यांनी म्हणजे पुलंनी लिहिलेल्या एका पत्रात. चंदू ठाकूर हे पुलंचे नातेवाईक ते वायुदलात होते. त्यांच्या जवळच्या मित्राचं विमान अपघातात निधन झालेलं होते. अशा प्रसंगी आयुष्याबद्दल निराशा वाटून त्यांनी पुलंना

एक पत्र लिहिलं. पुलंनी त्यांना उत्तर पाठवलं. सुमारे चारपानी आहे हे पत्र (मला हे पत्र सौ. मृदुलताई नि कृष्णराव जोशी ह्यांनी उपलब्ध करून दिले, त्यांचे मनःपूर्वक आभार, असो.) पुल चंदू ह्यांना पुढे लिहितात, तुझ्या पत्राचा सारांश हाच आहे की हे सारे आहे तरी काय?

जुन्या लोकांनीही हा प्रश्न विचारून घेतला आहे. 'कस्त्वम्? कुतः आयातः? तू कोण आहेस? कुठून आला आहेतस? पण सगळ्यात महत्वाचा प्रश्न, तू कशासाठी आला आहेस? हा प्रश्न महत्त्वाचा (तर पत्राचा प्रारंभच श्री आद्य शंकराचार्यांच्या कस्त्वम्? कुतः आयातः? ह्या प्रश्नांपासून केलेला आहे. हे शब्द आहेत आद्य श्री शंकराचार्यांच्या चर्पटपंजरिका ह्या प्रसिद्ध स्तोत्रातले आहेत. तो श्लोक असा –

**कस्त्वं कोऽहं कुत आयातः, का मे जननी को मे तातः।**
**इति परिभावय सर्वमसारम् विश्वं त्यक्त्वा स्वप्नविचारम्।**
**भज गोविन्दं भज गोविन्दं गोविन्दं भज मूढमते ॥१२॥**

तर (तू कोण आहेस? मी कोण आहे? मी कुठून आलो? माझी आई कोण आहे? माझे वडील कोण आहेत? सर्व प्रकारे हे विश्व असार आहे असे समजून, हे एक स्वप्न आहे, असे मानून त्याचा त्याग कर.)

श्री शंकराचार्य नि त्यांच्या शारीरभाष्याचा (शंकर भाष्याचा) विनोदपूर्ण उल्लेख 'व्यक्ती आणि वल्ली' ह्या मधील अण्णा वडगावकर या प्रकरणात पृ. १२९ वर आलेला आहे. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे नावाचा विद्यार्थी बी.ए.च्या वर्गात आहे. त्यांना शंकरभाष्य हा ग्रंथ लावलेला आहे. हा ग्रंथ फारच महत्त्वपूर्ण आहे, पण समजावयास जरा अवघडच आहे. ब्रह्मसूत्र ह्या प्रख्यात ग्रंथावरचे हे श्री आद्य शंकराचार्यकृत भाष्य म्हणजे विवरण आहे. तसे ते थोडे अवघडच आहे. तर पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे हा विद्यार्थी आपले संस्कृतचे प्राध्यापक अण्णा वडगावकर ह्यांच्याकडे येतो नि म्हणतो, ''सर ते शांकरभाष्य आपल्याला काही समजत नाही बुवा! पुन्हा एकदा समजावून द्या.''

''अरे, (पुरुषोत्तम) खर सांगू का तुला? शांकरभाष्य मला तरी कुठे नीट कळलंय?''

पुल म्हणतात, ''मी बघतच राहिलो त्यांच्याकडे. (व्यक्ती आणि वल्ली प्रकाशक, देशमुख आणि कंपनी, पुणे)

असो आणि कहर झाला – फिरेंझ फ्लोरेन्स ह्या इटलीतील नगरीत. जी महान कलानगरी, शिल्प, स्थापत्य, वास्तू, चित्र आदी कला इथे आपल्या पूर्ण वैभवाने नांदत आहेत. ख्रिस्त धर्माचाही इथे खूप मोठा पगडा. अशा या नगरीत पुलंनी एक गोष्ट पाहिली नि पुल थक्कच झाले. आपणही चकित, थक्क, आनंदित, उत्साहीत होऊ. (जावे त्यांचा देशा, फ्लोरेन्स आणि शंकरार्चा, पृ. ३६, श्रीविद्या प्रकाशन).

काय होती ती थक्क करणारी गोष्ट? पुलंनी फ्लोरेन्सचं (फिरेंझचं) मनसोक्त दर्शन घेतलं आणि त्यांनी डॉ. गास्तोने उगुच्चिओनी

ह्यांची भेट घ्यावयाचे ठरविले. ते म्हणजे फ्लोरेन्समधले सर्वश्रेष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉक्टर. पुलंना त्यांनी घरी बोलाविले ह्याचेच सर्वांना आश्चर्य वाटले. पुल त्यांच्या घरी गेले.

'चला, माझ्या भारतातल्या मित्राला भेटायच्या खोलीत जाऊ या' म्हणजे प्रत्येक देशातल्या पाहुण्यांना भेटायची निराळी खोली बांधणारा हा डॉक्टर मला अजबच वाटला. या धिप्पाड माणसाला आम्ही येण्याचा विलक्षण आनंद झाला होता. 'जरा थांबा... तुम्हाला मोठा मजेदार धक्का बसणार आहे.' असा मिष्किल भावही त्यांच्या चेहऱ्यावर होता. डॉक्टरांनी दार उघडले नि थोडे पुढे जाऊन तो इटालियन डॉक्टर आम्हाला म्हणाला, 'सुस्वागतम्! भारतातल्या माझ्या सगळ्या आठवणी इथं साठवल्या आहेत.'

त्या दारातून त्या दालनाचे जे पहिले दर्शन झाले ते अपूर्व होते. समोरच्या भिंतीवर आद्य शंकराचार्य आपल्या शिष्यांना एका वृक्षाच्या पारावर बसून पाठ देत असल्याचे सुंदर चित्र होते. त्या दालनाच्या चारी भिंती छतापर्यंत ग्रंथांनी भरलेल्या होत्या. एके ठिकाणी एक सुरेख कोरीव काम केलेल्या टेबलावर समया होत्या. छोटा देव्हारा, पूजेची उपकरणे होती. उदबत्तीचा पुडा होता. देव्हाऱ्यात शंख, शिवलिंग मला वाटते शाळीग्रामही असावा, थोड्याशा मोकळ्या जागेत ख्रिस्ताचे एक फार सुंदर चित्र होते. मी त्या चित्राकडे टक लावून पाहात होतो. तेवढ्यात डॉक्टरांनी बसल्याबसल्या एक कळ दाबली आणि समोरच्या स्टँडवर आपोआप एक चित्रपटाचा पडदा वर गेला.

'चला जरा भारतात हिंडून येऊ या.' पण डॉक्टर, आमच्या देशाबद्दल तुम्हाला इतकी ओढ कशी निर्माण झाली?

ईत ईज एक मीस्तरी, ते एक कोडे आहे. मी दहा वर्षांचा असताना मला स्वप्नात एक देऊळ दिसले आणि कोणीतरी मला तिथे चलण्याविषयी आग्रह करीत आहे, असे वाटायचे. अनेकदा असे झाले फ्लोरेन्समध्ये असं काहीच नव्हतं. माझ्या वडिलांनी सांगितलं ओरिएंटल पागोडा असे असतात. मग मी देशोदेशींच्या वास्तुशिल्पांवरची पुस्तकं पालथी घातली आणि एका पुस्तकात मात्र ते देऊळ सापडलं. तामिळनाडूच्या कांचीतले ते आद्य शंकराचार्यांनी बसवलेले कामाक्षीचे मंदिर होते. ते देऊळ डॉक्टरांच्या मनात घर करून बसले होते. ते देऊळ शंकराचार्यांनी बसवलेले होते. त्यामुळे शंकराचार्यांविषयी ओढ उत्पन्न झाली. शंकराचार्यांमुळे त्यांचे भारतावर प्रेम जडले. प्रेमच नव्हे तर भक्ती. मग प्रत्येक दोन वर्षांनी भारताची भारतीय तीर्थांची वारी सुरू झाली. गीतेचा, उपनिषदांचा अभ्यास चालू झाला. भारतीय तत्त्वज्ञान आणि संस्कृत भाषेचा अभ्यास करणारे जे इटालियन पंडित आहेत, त्यांच्याशी स्नेह जमला. फ्लोरेन्स कलानगरीतले नागरिक असल्यामुळे भारतीय स्थापत्य, प्राचीन शिल्प यांच्यावर अतोनात प्रेम जडलं. पडद्यावर ते मला दक्षिणेतल्या मंदिरांची चित्रे दाखवू लागले. बिसमिल्लांच्या सनईची ध्वनिमुद्रिका लावून सौम्य अशा पार्श्वसंगीताची त्या

चित्रांना साथ दिली होती. 'हे ते देऊळ' पडद्यावर कांचीच्या कामाक्षीच्या मंदिराचे सुंदर चित्र आले होते. 'शिवोऽहम् शिवोऽहम शिवोऽहम्' डॉक्टर पुटपुटत होते. आणि कन्याकुमारीचे चित्र पाहताना आम्ही भारावून गेलो नि विराट शांतिस्वरुपाच्या दर्शनाने माझ्याही तोंडून उद्‌गार आले,

'ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः।'

ख्रिस्त आणि शंकराचार्य समोरासमोर कसे हा विचार मनात आला नि डॉक्टरच म्हणाले, 'ख्रिस्त हा माझ्या पूर्वजन्मीचा गुरू नि शंकराचार्य हा या जन्मीचा गुरू, असे म्हणत दोन्ही हातांची ओंजळ त्यांनी शकराचार्यांच्या फोटोकडे नेली. डॉक्टरांचा तो भक्तिभाव बघून मी चकितच झालो. ज्या नगरीतल्या कणाकणावर ख्रिस्ती जीवनाचा इतका सुंदर-कलात्मक संस्कार घडला आहे, त्या फ्लोरेन्समधला एक अत्यंत यशस्वी मनोरोगतज्ज्ञ त्या ख्रिस्ताला आपल्या पूर्वजन्मीचा गुरू म्हणत होता आणि शंकराचार्यांच्या तसबिरीपुढे 'ह्या ओंजळीत तुझा कृपाप्रसाद दे', असे मागणे मागत उभा होता. ज्याच्याशी वंश, धर्म, भाषा, देश यांपैकी कसलेही नाते नाही, अशा एका संन्याशाला ह्या जन्मीचा आपला बाप-आई, गुरू-सखा, बंधू सारे काही मानत होता. 'ही इज माय गुरू-माय एव्हरीथिंग', आपण मुळातूनच हे प्रकरण वाचावे, ही विनंती.

पुन्हा एकदा श्रीशंकराचार्य भेटतात 'एक शून्य मी' ह्या पुस्तकात (प्रकाशक-मौज प्रकाशन) 'शूरा मी वंदिले' ह्या प्रकरणात. काश्मीरमध्ये असंख्य सौंदर्यस्थळे आहेत. उदा. हरिपर्वत किल्ला, नगीन झील, हजरत बल दर्गा, परी महल, दाल सरोवर, शालिमार बाग, मट्टन (मार्तंड मंदिर) कोकर नाग, वेरीनाग, चरारे शरीफ, वुलर सरोवर, गुलमर्ग, पहलगाम, सोनमर्ग, चष्मेशाही, निशातबाग इत्यादी. पण निसर्ग-शिल्प, वास्तुप्रिय पुलंना सर्वांत प्रिय काय असेल? कल्पना करता येईल? अवघड आहे, मलाही सुचले नसते पण नास्तिक, सुधारक, पुरोगामी पुलंना सर्वात प्रिय आहे श्रीनगरमधील ती प्रख्यात 'आद्य श्रीशंकराचार्य टेकडी'- मलाही आश्चर्य वाटले. हा उतारा मिळण्यास कन्या चि. अर्चना नि चि. वंदना ह्यांचे फार साहाय्य आहे. आनंद वाटला. १९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर शासनाने महाराष्ट्रातल्या पाच साहित्यिकांना पु. भा. भावे, पु. ल. देशपांडे, वसंत सबनीस, वसंत कानेटकर, ग. दि. माडगूळकर ह्यांना सीमेवर म्हणजे लडाख येथे पाठविले होते. त्यांचा मोठाच दौरा झाला आणि मग पुलंनी त्यावर अतिशय सुरेख स्फूर्तिदायक लेख लिहिला. तो लेख 'एक शून्य मी' या त्यांच्या पुस्तकात समाविष्ठ आहे. प्रकाशक मौज प्रकाशन. हे पाचजण श्रीनगरला पोहचतात, आता पुलंच्या भाषेत - आमच्या प्रवासी मंदिराच्या (टूरिस्ट सेंटरच्या) उशालगतच एक उंच टेकडी आहे आणि टेकडीवर 'श्रीशंकराचार्य मंदिर' आहे. - महिन्यापूर्वीच मी केरळातल्या आद्य श्रीशंकराचार्यांच्या कालडी गावी गेलो होतो आणि आता भारताच्या उत्तर टोकाला! ह्या दक्षिण टोकातल्या महापुरुषाने ज्या

डोंगरमाथ्यावर बसून शंकराची उपासना केली ते मंदिर पाहात होतो. कुठे केरळातल्या पेरियार नदीच्या तीरावरचे ते कालडी गाव आणि कुठे काश्मिरातले श्रीनगर! कसल्या दुर्दम्य जिद्दीने भारलेली ही माणसे होती. आम्ही विमानांच्या तीन तासांच्या प्रवासाला वैतागलो होतो आणि हा आठ वर्षांत चतुर्वेदी झालेला आईबापावेगळा नंबुद्री पोर मरत्या हिंदुधर्माला संजीवनी देण्यासाठी हजारो मैलांची वाट तुडवत, अरण्ये ओलांडत, पर्वत चढत-उतरत कैलासराण्याच्या दर्शनासाठी केरळातून काश्मीरपर्यंत आला होता. काश्मीरात मला सर्वांत जर काही सुदंर वाटले असेल तर ते डोंगर माथ्यावरचे आद्य श्रीशंकराचार्यांचे मंदिर. गौरीशंकराहूनही जर उंच काही असेल तर ती त्या नंबुद्री-विप्राची विजिगीषा! अद्वैताची ध्वजा घेवून हा प्रखर बुद्धिमत्तेचा विद्वान पेरियार नदीचे ते पवित्र तीर सोडून जो निघाला तो पाखंड्यांना चेपत चेपत थेट काश्मिरपर्यंत आला. ज्ञानदेवासारखीच काहीशी त्याचीही कथा. गावातील गढूळ तोंडे गलिच्छ बोलत. आठव्या वर्षी वेद म्हणणाऱ्या पोराला डोक्यावर घेऊन नाचावे तिथे त्याला वाळीत टाकला. वास्तविक अशा मुलात किती कडवटपणा यायला हवा! ज्ञानेश्वरात किती कडवटपणा यायला हवा! (पूर्वी) लोकांनी धर्मांतरे केली पण शंकराचार्य काय, ज्ञानेश्वर काय हे धर्मसंस्थापनेचे नर. त्यांनी हिंदुधर्मावर साठलेले शेवाळ दूर करून सनातन आणि निर्मळ विचारांचे पाट देशभर सोडले, काश्मिरातल्या त्या डोंगरमाथ्यावरचे ते शंकराचार्यांचे मंदिर. रात्रीच्या अंधारात तिथे पेटणारा तो दिवा पाहून दिवसा आलेले चिल्लर जिकिरीचे अनुभव कुठल्या कुठे नाहीसे झाले.

पुढे मग लडाखचा, युद्धभूमीचा दौरा आटोपून मंडळी श्रीनगरला आली. उद्या विमानाने मुंबईला निघावयाचे. मनात हुतात्मा झालेल्या वीरांचे, त्यांच्या पराक्रमाचे, त्यातील एका वीराने हृदयाशी धरलेल्या पिंपळपानावरच्या मूर्तीचे (बाल कृष्णांचे) ते सुभग दर्शन आठवले, त्या हुतात्मा वीरांच्या समाध्या मनात स्मरल्या आणि त्या रात्री श्रीनगरला पुन्हा एकदा मी शंकराचार्यांच्या त्या टेकडीवरील मंदिरावर पेटलेला दीप पाहत क्षणभर उभा राहिलो आणि दाटलेल्या कंठाने प्रार्थना केली,

''हिंदू धर्मावर अवकळा आली त्यावेळी एकदा अवतार घेतलात तुमच्या नव्या अवताराची प्रतीक्षा आम्ही किती काळ करावी?''

पुरचुंडी (मौज प्रकाशन) हे पुस्तक पुलंच्या वाढदिवशी (नोव्हेंबर १९९९ ला प्रसिद्ध झाले. त्यातील एक प्रकरण 'सर्व काही आणि काही नाही'. यातही आपणास श्रीशंकराचार्य भेटतात. हा लेख थोडासा तत्त्वज्ञानाकडे झुकणारा आहे. एखादा तत्त्वविचारसुद्ध पुलं किती समर्थपणे पेलू शकतात! खरंच बहुरुपी आहे हा मनुष्य! ह्याच लेखात आपण कोऽहम्? कस्त्वम्। (मी कोण आहे? तू कोण आहेस, ह्याची चर्चा केली आहे. आद्य श्रीशंकराचार्यांचे हे प्रसिद्ध 'चर्पटपंजरिका स्तोत्र' त्यातील 'भज गोविन्दं भज गोविन्दं। भज मूढमते।' ह्या ओळी अतिशय

प्रसिद्ध आहेत. तर वर उल्लेखिलेल्या प्रकरणात पु. ल. म्हणतात, 'मी कोण आहे? असं वाक्य होतं. अशीच एक फार मोठी प्रतिसृष्टी निर्माण करणाऱ्या रवीन्द्रांनी देखील शेवटच्या आजारात लिहिलेल्या कवितेत असाच प्रश्न विचारला आहे.

अस्तित्वाच्या पहिल्या आविष्काराच्या वेळी प्रथम दिनाच्या सूर्याने प्रश्न केला होता. कि तुमि? कोण तुम्ही? मिळालं नाही उत्तर, वर्षांवर वर्षं लोटली, शेवटचा सूर्य, शेवटचा प्रश्न विचारला त्याने पश्चिम सागरतीरावरून निःस्तब्ध सायंकाळी, के तुमि? कोण तुम्ही? उत्तर मिळालं नाही त्याला.

अनादिकाळापासून विचारले गेलेले प्रश्न :

कस्त्वम्? - कोऽहम्?... मग कोणी 'सोऽहम्' वर समाधान मानले. कुणी कशावर. कुणी कशावर. पण कुठं कुणाचं संपूर्ण समाधान झालेलं दिसत नाही.

आद्य श्रीशंकराचार्यांचा मूळ श्लोक असा - का ते कान्ता कस्ते पुत्रः संसारोऽयमतीव विचित्रः। कस्त्वं वा कुत आयातः तत्त्वं चिन्तय तदिह भ्रातः।।८।।

कोण तुमची पत्नी? कोण तुमचा पुत्र? हा संसार अतिशय विचित्र आहे, तुम्ही कोण आहात, कुठून तुम्ही आलात? बंधो, ह्या गोष्टीचा प्रथम विचार कर. (भज गोविन्दम् स्तोत्र)

२६ फेब्रुवारी १८८३ अंदमान सेल्युलर जेलसमोरील मैदानात पु. ल. देशपांडे ह्यांचे स्वातंत्र्यवीर सावरकरांवर अप्रतिम भाषण झाले. त्या भाषणात त्यांनी आद्य श्रीशंकराचार्यांचा उल्लेख केला. सावरकर आपल्या शेवटच्या इच्छापत्रात आपले शव विद्युतदाहिनीत टाकून द्यावे अशी इच्छा व्यक्त करतात. ते शव आहे, त्याला एक काष्ठ यापलीकडे अर्थ राहिलेला नाही, असं मानणं हे आद्य शंकराचार्यांसारखं झालं. आद्य शंकराचार्यांची आई मरण पावली. ब्राह्मणांनी तिच्या अंत्यसंस्कारावर बहिष्कार टाकला. मृतदेह एकट्या शंकराचार्यांना उचलून स्मशानात नेता येईना. त्यांनी हे काष्ठ आहे असं म्हणून त्या मृतदेहाचे तीन तुकडे केले आणि एकेक तुकडा नेऊन दहन केले. विज्ञाननिष्ठेची हीच परंपरा सावरकरांनी पाळली. आज आम्ही पाहतो, स्वतःला सेक्युलर म्हणवणारे लोक आपल्या इच्छापत्रात आपली रक्षा कुठल्या तीर्थात नेऊन टाकावी हे नमूद करतात. इतरांवर संकुचित धार्मिकतेचा आरोप करणाऱ्या नेत्यांच्या मरणानंतर त्यांच्या रक्षाविसर्जनाचा तमाशा दहादहा दिवस चाललेला असतो आणि सावरकर मात्र आपले शव विद्युत् दाहिनीत टाका म्हणतात. (विद्युत दाहिनी हा शब्दही बहुधा त्यांचाच).

(श्रोतेहो! परचुरे प्रकाशन मंदिर, भाषण एक, पृ.२९)

पुल-सुनीताताई नि सर्व प्रकाशक ह्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

**सुहास हरी जोशी**
३२ लक्ष्मी उद्यान, नवी पेठ,
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी - ९९२२४१९२१०

●●●

'प्रपंच व परमार्थ या दोन विरोधार्थी संज्ञा आहेत. प्रपंचात रुतलेल्या संसारी माणसास परमार्थ साधणे कठीण आहे म्हणून परमार्थात प्रगती करावयाची असेल तर माणसाला प्रपंचापासून दूर राहिले पाहिजे' असेच काहीसे प्रतिपादन संन्यासमार्गी आजपर्यंत करत आले आहेत. वेदविद्या कथन करणारी उपनिषदेही, ईश, कठ वगैरे हाताच्या बोटावर मोजता येण्यासारख्या थोड्या उपनिषदांचा अपवाद वगळता बहुवंशी निवृत्तीपरच भासतात. संत तुकारामांनी सुद्धा ''दुःख पर्वताएवढे सुख जवापाडे'' असेच संसाराचे वर्णन केले आहे. भक्तियोगाच्या अगदी उच्चस्तरावर पोचलेल्या संत तुकारामांकडून संसाराकडे दुर्लक्षच झाले होते. त्यांचा संसार ''तेषा नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्।'' (भ.गी.अ.९ श्लोक २२ चरण २) या न्यायाने भगवंतच चालवत होता. या उलट श्री रामदास स्वामींनी, स्वतः ब्रह्मचर्यव्रती-संन्यासी असूनसुद्धा सामान्य माणसाने संसार नेटका कसा करावा व तो करत असताना समाज सेवा व देशसेवा करून परमार्थ कसा साधावा हे सांगण्यासाठी दासबोध (प्रवृत्तीपर) ग्रंथ लिहिला.

प्रपंचात वागताना पती आणि पत्नी यांचे मानसिक व आत्मिक मीलन झाले असल्यास, उभयतांना, कर्तव्यदक्ष वृत्तीने आदर्श संसार उभा करत असतानाच उच्चतम परमार्थ सिद्धीही कशी प्राप्त होऊ शकते याचे उत्तम प्रात्यक्षिक उदाहरण, म्हणजे संत एकनाथांचा संसार! त्यांच्या परमार्थिक अधिष्ठान असलेल्या आदर्श संसारातील गृहसौख्य इतके अपंरपार होते की ते चाखण्याचा मोह प्रत्यक्ष परमेश्वरही आवरू शकला नाही आणि म्हणून ते चाखण्यासाठी परमेश्वर त्यांच्या घरी पाणक्या म्हणून सेवा करीत राहिला होता.

भगवान कृष्ण सांगतात -

**लाभली गिरिजा पत्नी साध्वी संत पतिव्रता। आणिला स्वर्ग संसारी उभयांनी गृहींच त्या।।१५।।**

**मलाहि जाहला मोह चाखण्या गृहसौख्य ते। सुख स्वर्गाहुनी श्रेष्ठ, मद्भक्ताच्या गृहींच जे।।१६।।**

**झालो मी पाणक्या त्याचा, देवी रोष जरी धरी। रमलो करता सेवा डुंबलो सुखसागरी।।१७।।**

**करी असा जो संसार एकनाथाचि सारखा। आहे मी जाण तेथेच भक्तागृहिच राबता ।।१८।।**

(दि.२९ व ३० मे २००३ या दिवशी सकाळच्या ध्यानात प्रस्तुत लेखकाला भगवान कृष्णाने सुचविलेल्या एकनाथ-प्रशस्तींतील हे श्लोक आहेत.)

२. पूर्वी भ. नारायणाने नारदमुनींना सांगितले होते -

**नाऽहं वस्यामि वैकुंठे, न योगीनां हृदयांतरे।**
**यत्र भक्ताः कीर्तयन्ति मां तत्राऽहं विद्धि निश्चितम्।।**

की, जिथे माझे भक्त सामुहिक रीतीने माझे भजन कीर्तन करत असतील तिथे मी तुला नक्की सापडेन. पण याच्याही पुढे जाऊन वरील एकनाथ-प्रशस्तीत भगवंत सांगतात की, एकनाथा-सारखा संसार करणाऱ्या गृहस्थीच्या घरात मी नुसता नाही तर त्या भक्ताची सेवा करताना तुम्हाला सापडेन.

३. विषयांकडे धावणाऱ्या इंन्द्रियांना स्वैर सोडून कामासक्त वृत्तीने केलेला प्रपंच परमार्थ मार्गावरचा मोठाच अडसर बनून प्रापंचिकास नरकाच्या मार्गावर घेऊन जातो यात शंकाच नाही. याच प्रकारच्या प्रपंचाचे नकारात्मक वर्णन अध्यात्मिक आणि संत वाङ्मयांत केलेले आपणास आढळते.

परंतु तोच प्रपंच परमेश्वराचे अधिष्ठान ठेवून भ. गीतेत सांगितलेल्या कर्मयोगाच्या युक्तीने केल्यास परमार्थ प्राप्तीचे मोठेच साधन होऊ शकतो, हे भगवंताने केलेल्या एकनाथाच्या संसाराच्या वर्णनावरून स्पष्ट होते.

अशा तऱ्हेने केलेला प्रपंच आणि परमार्थ हे एकाच नाण्याच्या दोन बाजूप्रमाणे एकमेकांस पूरकच होत असतात. ज्याप्रमाणे, अनियंत्रित अग्नी वनेच्या वनेच जाळून भस्म करतो, पण तोच अग्नी शेगडीत संयमित केल्यास जीवनाला आवश्यक असे अन्न रांधण्यास उपयोगी पडतो. त्याप्रमाणेच अनियंत्रित रीतीने केलेला जो प्रपंच सर्व नाशास कारणीभूत होतो तोच प्रपंच कर्मयोगाच्या युक्तीने नियंत्रित केल्यास गृहस्थीला मोक्षप्राप्तीही देऊ शकतो.

**अग्नी जोचि करी भस्म, संयमें करि रांधन।**
**तैसे प्रपंच, योगें हो, परमार्थासि साधन।।४।।**
**नामगीता अ.९वा**

४. वेदविद्येत सांगितलेल्या ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास या चारी आश्रमांत गृहस्थाश्रमच सर्वश्रेष्ठ आहे. ब्रह्मचर्य, वानप्रस्थ आणि संन्यास या तिन्ही आश्रमीयांना गृहस्थाश्रमीचाच आधार असतो. ब्रह्मचर्य अवस्थेत असलेल्या आपल्या संततीचे पालन पोषण शिक्षण गृहस्थाश्रमीच (प्रापंचिकच) करत असतो. वानप्रस्थात प्रवेश केलेल्या माता-पित्यांना गृहस्थी मुलाचाच आधार मिळतो, तर निरग्नी सन्यासींना गृहस्थाच्या घरातच अन्नाची भिक्षा मिळते. वेदविद्येत सांगितलेले धर्म, अर्थ, काम नी मोक्ष हे चारी पुरुषार्थ गृहस्थीच मिळवू शकतो.

समाजाच्या म्हणजेच मानवजातीच्या सातत्यासाठीही, संतती व ती निर्माण करणारा गृहस्थाश्रमच अनिवार्य ठरतो. समाजातील सर्व व्यक्ती जर ब्रह्मचारी योगी-संन्यासी बनल्या तर मानव समाजच नष्ट होईल.

त्रेतायुगात श्रीरामाला उपदेश करणारे त्रिकालज्ञानी वसिष्ठ ऋषीही विवाहित असून प्रपंच सांभाळत होते. इतकेच नव्हे तर निवृत्तीपर उपनिषदे रचणारे याज्ञवल्क्यादि ऋषीही विवाहितच होते हे सत्य आहे.

५. तसे (म्हणजे तरा निराळ्या दृष्टीने) पाहिले तर, सर्व शारीरिक सुखात श्रेष्ठ असे जे 'कामसुख' ते धर्मवैध आणि सुरक्षित रुपात मानवाला वैवाहिक जीवनात म्हणजे प्रपंचातच लाभू शकते. प्रत्यक्ष भगवंत गीतेच्या ७ व्या अध्यायात म्हणतात -

**'धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ।।'**

'मानवातला धर्मानुकूल कामविकार हा मीच आहे, तेथे माझेच अधिष्ठान असते.' याचा अर्थ, 'विवाहित दंपती जे कामसेवन करतात ते देवदत्तच म्हणजे शुभदच असते' असाच होतो. म्हणून वैवाहिक जीवनात (प्रपंचात) मिळणाऱ्या कामसुखाला दैवी स्पर्श असतो असे म्हणावयास हरकत नाही.

त्यानंतर पतिपत्नींच्या मीलनातून निर्माण होणाऱ्या संततीच्या आगमनामुळे त्या उभयतांना होणारा अपत्यप्रेमाच्या सर्व श्रेष्ठ अतुलनीय मानसिक सुखाचा अनुभव हा केवळ प्रपंचातच मिळू शकतो. त्यात सुद्धा स्त्रीला मिळणारा मातृत्वाचा आनंद हा आणखी वरच्या दर्जाचा असतो. या आनंदाची तुलना श्री गोंदवलेकर महाराज तर भक्ताला देवाशी अनुसंधान साधल्यावर होणाऱ्या परमानंदाशी करतात -

**बाळंत विसरे जैसी स्त्री त्या प्रसुतिवेदना।**
**कष्टही गर्भभाराचे, बाळाचे मुख पाहता।।**

**तैसेचि साधना कष्ट विसरे भक्त त्याक्षणी।**
**भेटता परमानंद विसरे तो निजासही।।**

(६ ऑगस्टच्या दैनंदिन प्रवचनातील आशयाच्या भाषांतराचे अनुष्टुप छंदातील हे श्लोक आहेत.)

या व्यतिरिक्त प्रपंचात आपल्यावर निर्व्याज प्रेम करणारी, आपल्या सुखदुःखात बरोबरीने भाग घेणारी, संकटकाळात आपल्या पाठीशी ताठ उभी रहाणारी अशी दुसरी व्यक्ती आपल्याला लाभली आहे ही भावनाच उभयतांना निरंतर आनंददायी होत असते.

६ . याप्रमाणे सर्वश्रेष्ठ असा शारीरिक आणि मानसिक आनंद देणारा 'प्रपंच' बहुवंशी 'दुःख-पर्वताएवढे' देणारा का होतो? परमार्थ मार्गात मोठा अडसर का बनतो? याला मुख्य कारण आहे अनियंत्रित 'कामक्रोध', असे भ. गीता सांगते.

**काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः।**
**महाऽशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ।।३७।। अ. ३**

मराठीत

काम नी क्रोध दोन्ही ते जन्मती जे रजोगुणीं।
अधाशी व महापापी वैरी त्यांनाच जाण ची ।।३७।।

पुढे सोळाव्या अध्यायात, काम क्रोध आणि लोभ हे त्रिकुट म्हणजे नरकाचे त्रिविध द्वारच आहे, असे वर्णन आले आहे.

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनात्मनः।**
**कामः क्रोधस्तथा लोभः तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ।।२१।।**

मराठीत –

नरकाची तीन ही द्वारे नेती नाशास आपणां।
क्रोध काम तसा लोभ, त्याज्य ते याच कारणां।।२१।।

विषयांतच मन रमल्यामुळे उत्पन्न होणारा दुष्पूर काम जर स्वैर झाला तर त्यापासून क्रोध, क्रोधापासून स्मृतिभ्रम आणि शेवटी या सर्वांची परिणती सर्व नाशात होते. असा हा क्रम गीतेच्या दुसऱ्या अध्यायात उत्तम रीतीने वर्णन केला आहे.

**ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते।**
**संगात् सञ्जायते कामः कामात् क्रोधोऽभिजायते ।।६२।।**

**क्रोधाभ्दवति सम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः।**
**स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।६३।।**

मराठीत –

विषयीं ध्यास होताची उद्‌भवे पार्थ संग तो।
उद्‌भवे काम संगाने कामापासून क्रोध तो ।।६२।।

क्रोधाने होय सम्मोह संमोहाने स्मृतिभ्रम।
बुद्धिनाश भ्रमाने तो अंती जो सर्वनाशक ।।६३।।

७. या सर्व प्रकरणात 'काम' हाच मुख्य खलनायक आहे. कामामुळे उत्पन्न होणाऱ्या कितीही इच्छा पुऱ्या झाल्या तरी कधीही न शमणारा 'काम' हाच प्रपंचात 'दुःख पर्वताएवढे सुख जवापाडे' होण्यास कारणीभूत होतो आणि परमार्थाच्या मार्गावरील जणू वाटमाऱ्याच होतो.

८. आता प्रत्यक्ष व्यवहारात संसारी मनुष्य या 'कामा'च्या प्रभावामुळे निरंतर अस्वस्थ व चिंताग्रस्त कसा राहतो ते पाहू. प्रपंचास वागताना एखाद्या माणसाला एखाद्या वस्तू वा विषयाबद्दल आकर्षण वाटले की ती वस्तू त्याला हवीशी वाटते व ती मिळविण्यासाठी तो कार्यरत होतो. पण ती वस्तू त्याला मिळेपर्यंत तो अस्वस्थ राहतो. ती वस्तू मिळविण्यात अडचणी आल्या की त्याची आतुरता आणखी वाढते व तो चिंताग्रस्त होतो. ती वस्तू मिळाली नाही तर तो दुःखी व हताश होतो व त्याच्या मनाला एकप्रकारची हुरहूर लागून राहते. बर ती वस्तू मिळविण्यात यश मिळाले की त्याला आनंद होतो. पण तो क्षणिक असतो, कारण त्याला तोपर्यंत दुसरी वस्तू मिळविण्याची इच्छा होते व त्याचे मन अस्थस्थच राहते. एखाद्या झोपडीत राहणाऱ्या माणसाला आपल्याला एक खोलीची का होईना पण कायम स्वरूपाची न गळणारी अशी जागा मिळावी अशी इच्छा होते व ती मिळेपर्यंत तो अस्वस्थ असतो, अशी चाळीतील एक खोलीची जागा मिळाली की थोडा वेळ तो स्वस्थ होतो पण लगेच त्याला एक रुमचा सेल्फ कंटेन्ड फ्लॅट मिळावा अशी आस लागते. तोही मिळाला की डबलबेड रुमचा फ्लॅट त्याला हवा हवासा वाटू लागतो. मुले मोठी झाल्यामुळे एक रुमचा फ्लॅट त्याला गैरसोयीचा वाटू लागतो. अस्वस्थ होऊन तो मोठे कर्ज काढून दोन बेडरुमचा फ्लॅट घेतो.

तो मिळाल्याचा आनंद मात्र त्याचा पहिला हप्ता भरण्याच्या तारखेपर्यंतच टिकतो व त्यानंतर सतत तो महिन्याचे कर्ज फेडीचे हप्ते कसे भरावयाचे याच काळजीत राहतो.

९. कुठल्याही गोष्टीचा लाभ झाला तरी त्या गोष्टी बरोबर त्याच्या मागोमाग येणाऱ्या उपाध्यांना आपल्याला सामोरे जावे लागते टी.व्ही. घरात नसलेल्या घरात टी.व्ही. आला की मुले आनंदाने नाचू लागतात, घरच्या गृहिणीला शेजाऱ्यांप्रमाणे आपल्याकडेही टी.व्ही आला म्हणून समाधान वाटते. पण घरातला हा आनंदी-आनंद फार काळ टिकत नाही. कारण कोणता चॅनल लावायचा यावरुन मुलांच्यात भंडणे सुरु होतात. मुले टी.व्ही.लाच चिकटून बसतात व त्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ लागते व त्यामुळे मुलांचे आई-बाप मात्र काळजीत बुडून जातात व कुठून हा टी.व्ही. घरात आणला असे त्यांना वाटू लागते. म्हणजे एखादी इच्छा पूर्ण झाली तरी त्याचा आनंद क्षणिक असतो, तोपर्यंत इच्छा वाढते व ती पूरी होईपर्यंत अस्वस्थता कायम राहते, वासनाही कधीच शान्त होत नाही आणि मिळालेल्या वस्तूबरोबर येणाऱ्या उपाध्या मात्र वाढतच जातात आणि त्यामुळे मनुष्य आणखीनच कष्टी होतो व खऱ्या समाधानापासून तो दूरच राहतो. गरीब माणसाला धन नाही म्हणून चिंता असते तर धनी माणसाला धन आहे त्याचे रक्षण कसे करावयाचे याची चिंता असते, एकूण चिंता कोणालाच सुटत नाही.

श्री गोंदवलेकर महाराज म्हणतात -

**सर्व सुखी समाधानी संसारी न दिसे कुणी।**
**दारिद्र्य चिंता अधनां, सधनां धनरक्षणीं।।२६।।**

**यश ना मिळे तरी चिन्ता, मिळता हाव वाढते।**
**कामभोगें न ये तृप्ती, वासना मात्र वाढते ।।२७।।**

(श्री गोंदवलेकर नाम गीता अध्याय ९)

**उपसंहार**

कामविकार स्वैर सोडल्यास जो प्रपंच दुःख काळजी युक्त होऊन प्रापंचिकाला परमार्थ मार्गावरून ओढून नरकाच्या मार्गावर घेऊन जातो, तोच प्रपंच एकनाथ महाराजाच्या बाबतीत स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ गृहसौख्य देणारा व ब्रह्मप्राप्ती होण्यास मोठा सहाय्यक सखा ठरतो.

प्रपंचाच्या या दोन परस्परविरोधी रूपांचे विवेचन येथे समाप्त झाले. आता प्रपंच सुखदायी व परमार्थास अनुकूल कसा व कोणत्या युक्तीने करावा याचे विवेचन पुढील लेखात करू.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

•••

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

ज्ञानेश्वरांचे विलक्षण वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ कवी नव्हते; ते केवळ तत्त्वज्ञ नव्हते; तर ते तत्त्वज्ञ कवी होते. ज्ञानेश्वरीत एका ओवीत ते म्हणतात –

**वाचे बरवे कवित्व। कवित्वि रसिकत्व।**
**रसिकत्वि परतत्त्व। स्पर्शू जैसा॥**

याचा अर्थ असा की ज्या कवितेला परतत्त्वाचा स्पर्श झाला आहे तीच कविता अनंत काळपर्यंत टिकते.

प्रख्यात इंग्रजी कवी एझरा पाउंड असं म्हणाला आहे की 'Literature is a news which stays news'. अन्यथा प्रत्येक शतकाला एक दिग्गज कवी होऊन गेला व पुढच्या पिढीला त्या कवीच्या काही कविता देखील माहिती नसतात. मात्र ज्ञानेश्वरांचे वाङ्मय लिहून ७२४ वर्ष झाले तरी ज्ञानेश्वरीतून झरणारा प्रतीतीचा रस आज तसूभर देखील कमी झालेला नाही.

**दिने दिने यन्नवतामुपैति।**
**तदेव रूपम् रमणीयतायाः॥**

असे संस्कृत साहित्यात एक वचन आहे. याचा अर्थ असा की रोज नवे भासते तेच रमणीयतेचे स्वरूप आहे.

ज्ञानेश्वरीचे रूप आज देखील रोज नवे भासते.

मराठी विश्वकोशात ज्ञानेश्वरी या ग्रंथावर नोंद लिहिताना अ. र. कुलकर्णी या प्रख्यात विद्वानाने विस्तृत मत व्यक्त केले आहे. ते मूळातुन वाचण्यासारखे आहे.

ज्ञानेश्वरी ही गीतेवरील मराठीतील पहिली ओवीबद्ध टीका आहे. निवृत्तिनाथांच्या कृपादृष्टीखाली श्रोत्यांसमोर ज्ञानेश्वरांनी केलेले हे काव्यमय प्रवचन आहे, तो एक श्रोतृसंवाद आहे. ज्ञानेश्वरीच्या अठरा अध्यायांपैकी नऊ अध्यायांत ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांशी प्रकट संवाद साधलेला आहे. तो संवाद असा आहे की, ज्ञानेश्वरी वाचताना ज्ञानेश्वर आपल्या अगदी निकट येऊन आपल्याशी बोलत आहेत, असे आपल्याला वाटते पण असे असूनही ज्ञानेश्वरी कधी बहिर्मुख होत नाही, तिची अंतर्मुखता ती सोडत नाही.

गीतेवर अनेकांनी टीका लिहिल्या आहेत. उदा. शंकराचार्य, दासोपंत, वामनपंडित ह्यांसारखे पंडित-कवी, अर्वाचीनांपैकी लोकमान्य टिळक, योगी श्री. अरविंद, रा. गो. भांडारकर, ओल्डेनबर्गसारखे आधुनिक चिकित्सक, ॲनी बेझंटसारख्या थिऑसॉफिस्ट, डॉ. राधाकृष्णन् ह्यांच्यासारखे तत्त्वज्ञानी यांनी गीतेवर लहानमोठे निबंध, टीका वा भाष्ये लिहून गीतेचा अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि ज्ञानेश्वरी ही गीतेवरील सर्वश्रेष्ठ टीका होय, असे मत गुरुदेव रामचंद्र दत्तात्रेय रानडे यांनी आपल्या गीतेवरील ग्रंथात व्यक्त केले आहे. गीतेच्या तात्पर्यार्थाचे त्यांनी केलेले विवेचन थोडक्यात असे : ज्ञानेश्वरांनी तत्त्वज्ञान व साक्षात्कार ह्यांचे अतिशय सुंदर

व प्रभावी वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरांचे सृष्टिनिरीक्षण किती सखोल व सूक्ष्म होते, हेही त्यातून दिसून येते. सर्व विश्वाचे आदिकारण, त्याचा कर्ता आणि नियामक ईश्वर मानला पाहिजे, हे ज्ञानेश्वरांनी विश्व-प्रपंचावरून सिद्ध करणारे प्रमाण उत्कृष्ट रीतीने मांडले आहे (९.२८०-२८५). न्यायशास्त्रातील निरनिराळ्या प्रमाणांचा - विशेषतः बुद्धिप्रामाण्य व शब्दप्रामाण्य ह्यांचा - फोलपणा दाखवून ज्ञानेश्वरांनी भक्तीचा सिद्धान्त प्रस्थापित केला आहे. कोणतेही तार्किक प्रमाण मायानदी तरून जाण्यास उपयोगी पडत नसून त्यासाठी सद्गुरू, भक्ती आणि आत्मानुभव ह्यांचाच आधार घ्यावा लागतो. तो घेऊन मायानदी उतरून जाण्यास आरंभ केला, की तरून जायला तिच्यात पाणीच शिल्लक उरत नाही. भक्ती हा दुःखाकडून सुखाकडे जाण्याचा एकमेव मार्ग होय, हा सिद्धान्त ज्ञानेश्वरांनी मांडला. साधक भक्तिमार्गाची वाट चालत असताना त्याच्या शरीरावर आणि मनावर काही प्रतिक्रिया घडून येतात. हेच अष्ट सात्त्विक भाव होत. त्यांचे मनोज्ञ चित्रण ज्ञानेश्वरांनी केले आहे. त्याचप्रमाणे आनंद आणि शांती ह्या विरोधी भावना आत्मसाक्षात्कारात कशा एकत्व पावतात, हेही त्यांनी उत्तम प्रकारे दाखविले आहे. देव आणि भक्त यांच्या अंतिम ऐक्याचा विचारही त्यांनी विविध प्रकारे मांडला आहे पण हे ऐक्य संपूर्ण होत नाही. साधक ईश्वराच्या अधिकाधिक निकट जात असला, तरी देव आणि साधक ह्यांच्या ऐक्यात काही उणेपणा राहतो. जसे चतुर्दशीचे चंद्रबिंब पौर्णिमेच्या चंद्राहून किंचित उणे असते. असे होण्याचे कारण देह, मन इ. बंधने आहेत. ती असेपर्यंत देव तो देव आणि भक्त तो भक्त असेच हे नाते राहणार. प्रवासास निघाल्याबरोबर कोणी इष्ट स्थळी पोचत नाही. चांगल्या संगतीने इष्ट स्थळी आनंदाने पोचता येते. तरी प्रवास संपण्यासाठी काही वेळ लागतोच. साधकाच्या अंतिम विजयाचे ज्ञानेश्वरांनी जे रूपकात्मक वर्णन केले आहे, ते अतुलनीय असेच आहे.

रानडे ह्यांच्या मते ज्ञानेश्वरांनी केलेला गीतेचा तात्पर्यार्थ पूर्णपणे साक्षात्कारपर असून एका दृष्टीने शंकराचार्यांच्या वेदान्तपर अर्थाच्या पलीकडचा, वरचा आहे. ज्ञानेश्वरांच्या ठायी तत्त्वज्ञान, काव्य आणि आत्मानुभूती ह्यांचा झालेला अद्भुत त्रिवेणीसंगम हेच त्यांच्या गीतेवरील भाष्याचे महान वैशिष्ट्य होय.

ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांसमोर ज्ञानेश्वरी सांगितली त्यांच्याशी वेळोवेळी संवादही साधला. त्यांच्या या श्रोतृसंवादाची काही वैशिष्ट्ये पाहिली, तर असे दिसते, की त्यांचा श्रोतृसंवाद हा खऱ्या अर्थाने श्रोतृसंवाद आहे. त्या संवादाचे एक महत्त्वाचे आणि अनन्यसाधारण वैशिष्ट्य म्हणजे श्रोता हा निर्मितिप्रक्रियेत सहभागी आहे, ह्याची स्पष्ट जाणीव त्यांना आहे; तसेच हे संवाद सविस्तर आणि मनापासूनचे आहेत. त्यांतून त्यांच्या अलौकिक, आंतरिक व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार झालेला आहे. त्यामुळे ते

भावकाव्याच्या पातळीवर जातात. आपले विवेचन फुलवताना ज्ञानेश्वर श्रोत्यांच्या प्रगट व संभाव्य प्रतिक्रिया लक्षात घेतात. ज्ञानेश्वरांच्या श्रोतृसंवादात अंतर्मुखता असल्यामुळे त्यांचा श्रोता हा ज्ञानेश्वरीच्या आशयाचाच एक भाग होतो.

ज्ञानेश्वरांवर दोन संप्रदायांचे संस्कार होते. एक, नाथसंप्रदाय आणि दुसरा भागवतसंप्रदाय. ह्या दोन संप्रदायांतील विचारसरणींचे ऐक्य ज्ञानेश्वरांनी घडवून आणले आणि ज्ञानभक्तीचे एक नवे तत्त्वज्ञान जगाला दिले. ज्ञानेश्वरीच्या अखेरीस त्यांनी आपली नाथपंथीय गुरुपरंपरा दिलेली आहे. ह्याच उताऱ्यात 'शक्तीच्या गिरिवुहरी', 'शांभव अद्वयानंदवैभव', 'समाधिधन' इ. नाथसंप्रदायातील परिभाषा येते. तसेच ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी कुंडलिनीच्या संदर्भात जे विवेचन केले आहे, ते सर्व नाथपंथातील विचारसरणीचे आहे. नवव्या अध्यायात आलेल्या हठयोगाच्या विषयाकडे ज्ञानेश्वर नाथपंथीयांच्या दृष्टीनेच पाहतात. नाथपंथाच्या अशा खुणा ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी दिसतात. भक्तीचे तत्त्व पुनःपुन्हा मांडलेले दिसते. ज्ञानेश्वरीचे मुख्य अधिष्ठान भक्ती हेच आहे, असे दिसते, असे मत डॉ. शं. गो. तुळपुळे ह्यांनी मांडले आहे. ज्ञानेश्वरांनी मुख्यतः शंकराचार्यांचे अनुकरण केले आहे, असे डॉ. शं. दा. पेंडसे ह्यांचे मत आहे.

ज्ञानेश्वरीचे एक गाढे अभ्यासक डॉ. द. भि. कुलकर्णी ह्यांच्या मते गीतेने अद्वैत परोपरीने सांगितले परंतु हे अद्वैत द्विदल आहे, हे फक्त ध्वनित केले. गीतेच्या ह्या ध्वन्यर्थाचा ज्ञानेश्वरांना साक्षात्कारच झाला होता. त्यामुळे जीव, जगत व जगदीश्वर ही विभक्त त्रिपुटी नसून सर्वच शिव-शक्तीचे युग्म आहे, अशी त्यांची स्पष्ट प्रतीती होती आणि ह्याच युग्मात्मक प्रतीतीतून ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निर्माण झाला. काश्मीर शैव संप्रदाय (शैव मताची अद्वैतवादी शाखा) आणि ज्ञानेश्वरी ह्यांच्यातील संबंध स्पष्ट करताना ते म्हणतात, की वसुगुप्तापासून अभिनवगुप्तापर्यंतच्या काश्मीर शैव संप्रदायाच्या आचार्यांनी जे विश्वभाष्य केले, त्याची साक्षात अनुभूती ज्ञानेश्वरांना आली होती. अमृतानुभवात त्या अनुभूतीचे बौद्धिक आलेखन आहे, तर ज्ञानेश्वरीत त्या अनुभूतीचा भावगर्भ आविष्कार आहे. त्यामुळेच गीतेचा केवळ कर्मयोगपर, ज्ञानयोगपर, संन्यासयोगपर किंवा भक्तियोगपर अन्वयार्थ न काढता ज्ञानेश्वर तिचा समन्वयात्मक आणि साक्षात्कारात्मक अन्वय लावतात.

ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान चिद्विलासवाद ह्या नावाने ओळखले जाते आणि विश्वातील नाना पदार्थांच्या रूपाने एकच चैतन्य विनटलेले आहे, हा त्या तत्त्वज्ञानाचा मध्यवर्ती विचार आहे. हे तत्त्वज्ञान अद्वैती आहे तथापि शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाहून फारच भिन्न किंबहुना विरोधी आहे, असे मत मुख्यतः पंडित बाळाचार्य खुपेरकर ह्यांनी प्रतिपादिले आहे. ज्ञानेश्वरांनी जगास शंकराचार्यांप्रमाणे

मिथ्या मानले नाही. जग ही सद्वस्तूची प्रभा, आत्म्याचे स्फुरण, चैतन्याचा विलास आहे. शंकराचार्यांचे अद्वैत हे द्वितीय पदार्थांचा निरास करते ज्ञानेश्वरांचे अद्वैत हे द्वितीय पदार्थाच्या सामरस्याने निर्माण होते, असे त्यांचे म्हणणे आहे. हा फरक पडतो, कारण ज्ञानेश्वर हे नाथपंथीय होते आणि नाथपंथाचे तत्त्वज्ञान काश्मीर शैव संप्रदायाशी जुळणारे आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या मते, ज्ञानेश्वरांचा चिद्विलासवाद हा शंकराचार्यांपेक्षा अधिक प्रगत झालेली दृष्टी आहे. मोक्षपुरुषार्थाच्या साधनेत संन्यासाला अग्रस्थान देण्याचा आग्रह ज्ञानेश्वरांनी बाजूला ठेवला. अंतिम दृष्टिकोणातून अविद्याखंडन वा अज्ञानखंडन शंकराचार्यांपासूनअनेक अद्वैत वेदान्त्यांनी केले आहे. परंतु अज्ञानखंडनाच्या आधारावरच ज्ञानेश्वरांचे परतत्त्वदर्शन शंकराचार्यांच्या व इतर अद्वैत वेदान्तांच्या पुढे गेले आहे. ब्रह्म परमार्थ सत्य होय, ह्या मूळ सिद्धान्ताला बाधा न येता किंवा मर्यादा न पडता, ज्ञानेश्वर विचारक्षेत्रातला नवीन विजय मिळवीत आहेत. चिद्विलासवाद हाच तो विजय होय.

ज्ञानेश्वरीच्या भाषेचा विचार केला, तर गीतेसारख्या तात्त्विक ग्रंथावरील ही काव्यरूप मराठी टीका आहे पण येथे काव्य आणि तत्त्वज्ञान यांचे विलक्षण ऐक्य प्रत्ययास येते. मुख्य म्हणजे ज्ञानेश्वरांनी मराठीचे स्पष्ट भान ठेवले आहे. मराठीबद्दलचा अभिमान ठसठशीतपणे व्यक्त केला आहे. मराठीच्या आविष्कारक्षमतेविषयी त्यांना विश्वास होता. संस्कृतातील अनेक संदर्भ ज्ञानेश्वरीत आले असले, तरी भाषेच्या बाबतीतला तिचा खणखणीत देशीपणा टिकून राहिलेला आहे. ज्ञानेश्वरांच्या काळात मराठी नुकतीच वाङ्मयत्व पावली होती. तथापि ज्ञानेश्वरांच्या मराठी भाषेचे सुंदर रूप पाहिले, की भाषेचे वैभव काय असते, ह्याचा आनंददायक प्रत्यय येतो. ज्ञानेश्वरांनी अनेकदा श्रोत्यांपुढे आपली नम्रता प्रकट केली आहे तथापि त्या नम्रतेमागे त्यांच्या कवित्वशक्तीचा भक्कम अभिमानही आहे.

ज्ञानेश्वरीतील पसायदान ही एक अत्युत्कट प्रार्थना आहे. ज्ञानेश्वरांचे हे पसायदान म्हणजे मराठी भाषेचा आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे.

विश्वात्मक देवाला म्हणजेच श्रीविश्वेश्वरावाला ज्ञानेश्वरांनी पसायदान देण्याची विनवणी केलेली आहे. पसायदान म्हणजे कृपाप्रसादाचे दान. हे दान ज्याच्याकडून अपेक्षित आहे तो विश्वात्मक देव वा श्रीविश्वेश्वराव म्हणजे ज्ञानेश्वरांचे गुरू प्रत्यक्ष निवृत्तिनाथ होत.

ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायाच्या अखेरीस ज्ञानेश्वरांचे पसायदान म्हणजे प्रसाददान किंवा कृपेचे दान असून ज्ञानेश्वरी हा एक वाग्यज्ञ होता. ह्या वाग्यज्ञाने विश्वात्मक देव संतुष्ट व्हावा आणि त्याने मला पसायदान द्यावे, अशी प्रार्थना ज्ञानेश्वरांनी केलेली आहे.

ह्या पसायदानात विश्वात्मक देव, श्रीविश्वेश्वराव ह्या शब्दांनी ज्ञानेश्वरांनी त्यांचे गुरू निवृत्तिनाथ ह्यांचा निर्देश केला आहे, असे दिसते. ह्या पसायदानात ज्ञानेश्वरांनी व्यक्तिशः स्वतःसाठी म्हणून काहीच मागितलेले नाही. त्यांची प्रार्थना प्राणिजातांसाठी आहे. जे खलप्रवृत्तीचे असतील त्यांना सत्कर्मांत रस निर्माण व्हावा, सर्वांमध्ये जीवाभावाची मैत्री निर्माण व्हावी, जो जे वांछिल ते त्याला मिळावे, जे चंद्रासारखे आहेत, पण ज्यांच्यावर चंद्रावर असतो तसा कलंक नाही जे सूर्य आहेत, पण ज्यांचा ताप जगाला होत नाही, त्यांच्याशी सर्वांचे नाते जडावे, अशी विनवणी त्यांनी केली आहे. विश्वकल्याणासाठी केलेली ही प्रार्थना विश्वेश्वरावाने मान्य केल्याचे म्हटल्यामुळे 'ज्ञानदेवो सुखिया झाला' असे त्यांनी म्हटले आहे.

जागतिक स्पर्धेच्या व पर्यावरण ऱ्हासाच्या काळात आपण सध्या जगत आहोत. सामाजिक उन्नतीपेक्षा वैयक्तिक उन्नती पाहणाऱ्या सुखलोलुप समाजाचे भविष्य काय हा मोठा प्रश्न सर्वांसमोर उभा आहे. या विषण्ण करणाऱ्या परिस्थितीत ज्ञानेश्वर आपणास नवा विचार देतात.

७२४ वर्षांनंतर देखील ज्ञानेश्वर आज देखील ताजे टवटवीत वाटतात. फक्त गरज आहे ती त्यांना परत एकदा नव्याने समजून घेण्याची. मराठी भाषा व तिची सांस्कृतिक वीण घट्ट बांधण्यासाठी व कल्पकतेचे नवे सर्जन करण्यासाठी पुढच्या पिढीने ज्ञानेश्वरी नव्याने वाचली पाहिजे. ज्ञानदेवांचे आर्त आपल्या मनी प्रकाशले पाहिजे हीच प्रार्थना ज्ञानदेवांच्या चरणी करू या.

●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, ए/५०३, सन्निधीपार्क सोसायटी, हरीओम नगर, मुलुंड (पू.)-४०००८१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१